दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२९१ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, बुधवार, १० एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## मुंबईकरांसाठी महत्त्वाचे ! 'या' लोकांना भरावा लागेल दुप्पट मालमत्ता कर
## बीएमसीचा १ मेपासून नवा नियम

■मुंबई, विशाल कारंडे :
सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईतील दुकाने आणि आस्थापनांवर मराठी भाषेत, देवनागरी लिपीमध्ये ठळक अक्षरात नामफलक लावणे बंधनकारक आहे. तरीही मराठी नामफलक लावण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर कठोर बडगा उचलण्याचे निर्देश मुंबई महापालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. या निर्देशानुसार मराठी नामफलक नसलेल्या दुकाने आणि आस्थापनांना १ मे, २०२४पासून दुप्पट मालमत्ता कर भरावा लागणार आहे. तसेच ग्लो साइन नामफलकांना दिलेला परवानाही तत्काळ रद्द केला जाणार असल्याची माहिती मुंबई महापालिकेने दिली.

महापालिका आयुक्त गगराणी यांनी सोमवारी महापालिका मुख्यालयात आढावा बैठक घेतली. या बैठकीला उपायुक्त (अतिरिक्त कार्यभार) किरण दिघावकर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेनुसार दुकाने आणि आस्थापनांचे नामफलक मराठी भाषेत आणि देवनागरी लिपीत ठळक अक्षरांत लावण्याबाबत दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. ही मुदत २५ नोव्हेंबर, २०२३ रोजी संपुष्टात आली. त्यानंतर मुंबईतील दुकाने आणि आस्थापनांची २८ नोव्हेंबर, २०२३पासून तपासणी सुरू करण्यात आली. तेव्हापासून ३१ मार्च, २०२४पर्यंत एकूण ८७ हजार ४७ दुकाने आणि आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यापैकी सुमारे ८४ हजार ०७ इतक्या म्हणजेच सुमारे ९६.५० टक्के दुकाने व




**परवाने रद्द, अनामत रक्कम जप्त करा**
ग्लो साइन नामफलकांना मुंबई महापालिकेच्या लायसन्स विभागाकडून परवाने दिले जातात. असे परवानेही मराठी नामफलक नसलेल्या दुकाने आणि आस्थापनांच्या बाबतीत तत्काळ रद्द करून त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचेही आदेश आयुक्तांनी दिले. मराठी भाषेत, देवनागरी लिपीत असणारे फलक त्यांनी लावावेत. त्यासाठी नव्याने ग्लो साइन नामफलकांची नोंदणी करावी, असेही त्यांनी आदेशात नमूद केले.

आस्थापनांवर मराठी भाषेत, देवनागरी लिपीत नामफलक लावले असल्याचे आढळले. उर्वरित ३ हजार ४० दुकाने आणि आस्थापनांनी मराठी नामफलक लावले नसल्याने त्यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली. नोटीस बजावलेली प्रकरणे न्यायालयापुढे सुनावणीसाठी येतात. तर, काहीजण अधिनियमात असलेल्या तरतुदीनुसार तडजोडीने आपसात प्रकरण निकाली काढण्याच्या प्रशासकीय पद्धतीनुसार महापालिका उपायुक्त यांच्यापुढे सुनावणीसाठी दाखल होतात. त्यानुसार न्यायालयात एकूण १ हजार ९२८ प्रकरणे पोहोचली. यापैकी १७७ प्रकरणांची सुनावणी होऊन न्यायालयाने एकूण १३ लाख ९४ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तर, १ हजार ७५१ प्रकरणांची सुनावणी सुरू आहे. त्याचप्रमाणे महापालिकेकडे सुनावणीसाठी आलेल्या ९१६ प्रकरणांपैकी ३४३ प्रकरणे निकाली निघाली आहेत. त्यातून एकूण ३१ लाख ८६ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. उर्वरित ५७३ प्रकरणांच्या सुनावणीची प्रशासकीय कार्यवाही सुरू असल्याची माहिती दिघावकर यांनी दिली. मराठी भाषेत नामफलक नसलेल्या दुकाने आणि आस्थापनांना १ मे, २०२४ पासून दुप्पट मालमत्ता कर आकारण्यात यावा आणि त्यासाठी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी, असे आदेश महापालिका आयुक्त गगराणी यांनी बैठकीत उपस्थित संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना दिले.

**भुर्दंड बसणार**

ग्लो साइन नामफलकांचा परवाना रद्द झाला तर नव्याने परवाना मिळवून नवीन नामफलक तयार करावा लागणार. या बाबी लक्षात घेता संबंधित आस्थापनाधारकांना किमान २५ हजार रुपयांपासून ते तब्बल दीड लाख रुपयांपर्यंतचा भुर्दंड बसणार आहे.

## निवडणूक आयोगाची कारणे दाखवा नोटीस
## 'वर्षा'वर मुख्यमंत्र्यांची राजकीय बैठक



■मुंबई, यश सावंत,
लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असनाताही मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी 'वर्षा'वर होत असलेल्या राजकीय बैठकांची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. आयोगाच्या आदेशानुसार मुंबई जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या खासगी सचिव आणि विशेष कार्यअधिकारी यांना नोटिसा पाठविल्या असून त्यांचा खुलासा आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकिलगम यांनी सोमवारी दिली.


मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी शिवसेनेच्या सुकाणू समितीची बैठक 'वर्षा' बंगल्यावर पार पडली. या बैठकीस शिवसेनेचे मंत्री, आमदार तसेच नेतेही उपस्थित होते. या बैठकीवरून वादंग निर्माण झाला आहे. काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सचिन सावंत यांनी याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असून आचारसंहिता भंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. देशभरात आचारसंहिता लागू होऊन दोन आठवडे उलटून गेले तरी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानावर सतत राजकीय बैठका होत आहेत. हा आचारसंहितेचा खुलेआम भंग आहे. राज्य निवडणूक अधिकारी जागे आहेत का, अशी विचारणा सावंत यांनी केली होती.

त्याची दखल घेत आयोगाने लगेच मुंबई शहर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार जिल्हा निवडणूक अधिकारी रवि कटकधोंड यांनी मुख्यमंत्र्याचे खासगी सचिव अमोल शिंदे आणि विशेष कार्यअधिकारी व मुलाखत कक्षाचे प्रमुख नितीन दळवी यांना नोटीस बजावत या बैठकीबाबतचा खुलासा मागवल्याची माहिती सूत्रांनी दिली. काँग्रेसच्या तक्रारीची आयोगाने गंभीर दखल घेतली असून सबंधित अधिकाऱ्यांना नोटीस पाठवून खुलासा मागविण्यात आल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकिलगम यांनी दिली.

## 'जहाजबांधणी'तून २ कोटींचा गंडा, फसविणाऱ्या कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल

■मुंबई, दिगंबर जाधव,
देश-विदेशांत जहाजाने साहित्य पोहोचविण्याचा व्यवसाय करणाऱ्या माझगाव येथील एका कंपनीची दोन कोटींची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. मेसर्स मार सिलाओ मेरिटाइम या कंपनीने नवीन जहाज देण्याच्या बहाण्याने ही फसवणूक केली.

आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच माझगावच्या या कंपनीने भायखळा पोलिस ठाण्यात तक्रार केली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कंपन्यांमध्ये जहाजबांधणीचा करार करण्यात आला आणि



त्यानुसार शंभर दिवसांच्या आतमध्ये बोट पूर्ण करण्याचे ठरले. प्रत्येक टप्प्यावर थोडी थोडी रक्कम देण्याचे या करारामध्ये नमूद करण्यात आले होते. त्यानुसार माझगावच्या कंपनीकडून मेसर्स मार सिलाओ मेरिटाइम या कंपनीच्या बँक खात्यावर पैसे वर्ग केले जात होते. थोडे थोडे करून सुमारे दोन कोटी रुपये कंपनीला देण्यात आले. इतकी रक्कम अदा केल्यानंतर बोटीचे काम कुठपर्यंत आले हे पाहण्यासाठी माझगाव येथील कंपनीचे प्रतिनिधी दुबईला गेला. मात्र कंपनीने बोटीचे काम भारतामध्येच कोचिन येथे सुरू असल्याचे सांगितले.

कंपनीच्या वतीने बोटीचे काम प्रगतीपथावर सुरू असल्याचे फोटो पाठवले जात होते. कराराची मुदत जवळ अली तरी बोट पूर्ण न झाल्याने कंपनीचा आणखी एक प्रतिनिधी कोचिनला गेला. त्यावेळी प्रत्यक्षात तेथे असे काही काम सुरू नसल्याचे दिसून आले. येथील यार्ड मालकाकडे चौकशी केली असता मेसर्स मार सिलाओ मेरिटाइम या कंपनीमार्फत कोणत्याही बोटीचे बांधकाम सुरू नसल्याचे सांगण्यात आले. यावर कंपनीच्या प्रतिनिधींकडे विचारणा केली असता त्यांच्याकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाली. फसवणूक होत असल्याचे लक्षात असल्याचे लक्षात येताच माझगावच्या कंपनीने पोलिसांत धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून संबंधित कंपनी आणि त्यांच्या प्रतिनिधींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महाराष्ट्रातील ३ जिल्ह्यांमध्ये ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट आणि गारांचा पाऊस
### गुढीपाडव्याच्या दिवशीच शेतकऱ्यांवर आसमानी संकट



महाराष्ट्रातील 3 जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडातला घास हिरावला आहे. अवकाळी पावसामुळे पिकांचं खूप मोठं नुकसान झालं आहे. या अवकाळी पावसाची दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. त्यांनी तातडीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत.

■मुंबई, सचिन कदम :
गुढीपाडव्याच्या दिवशीच राज्यातील ३ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांवर आसमानी संकट कोसळलं आहे. महाराष्ट्रातील वर्धा, जळगाव आणि अमरावती या ३ जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. विशेष म्हणजे काही भागात गारांचादेखील पाऊस पडला आहे. वर्धा शहरासह जिल्ह्यात काल अवकाळी पाऊस बरसला. त्यानंतर आज सकाळी विविध भागात पुन्हा पावसाच्या सरी कोसळल्यात. मध्यरात्री विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला. मध्यरात्रीच्या सुमारास वर्धा शहरात गारपीटही झाली. अवकाळी पावसामुळे उकाड्यापासून दिलासा मिळालाय. पण शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस, गारपीटमुळे उन्हाळी पिकासह अन्य पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हिंगणघाट तालुक्यातील अल्लीपूर भागात यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. गारपीटमुळे तीळ, कोहळ, टरबूज, लिंबू यासह अन्य पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

**जळगावच्या जामनेरमध्ये अवकाळी पाऊस**

जळगावच्या जामनेर येथे अवकाळी पाऊस पडला आहे. विशेष म्हणजे राज्यात एकीकडे उन्हाचा कडाका बघायला मिळतोय. तर दुसरीकडे अवकाळी पावसाची हजेरी बघायला मिळत आहे. अवकाळी पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअस पार झाला आहे. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे नागरिकांची दाणादाण उडाली. जळगाव जिल्ह्यातील इतरही काही भागात अवकाळी पाऊस पडला. तर काही भागांमध्ये ढगाळ वातावरण आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला रब्बी हंगामातील गहू तसेच हरभरा आणि इतर पिकांचे नुकसान झाले आहे.

**अमरावतीत गारपीटसह वादळी वाऱ्याचा पाऊस**

अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार तालुक्यात आज सकाळी गारपीटसह वादळी वऱ्याचा पाऊस पडला आहे. अवकाळी पाऊस आणि गारपीटमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. चांदुर बाजार तालुक्यातील गहू, संत्रा, कांदा यांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. थुगाव आणि पिपरीमध्ये गारपीटाने झाल्याने संत्रा, गहू, कांदा पिकांचे नुकसान झाले आहे.

**शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, मुख्यमंत्र्यांचं आश्वासन**

दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अवकाळी पावसावर प्रतिक्रिया दिली आहे. "अवकाळी पाऊस, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न, चाऱ्याच्या प्रश्नासंदर्भात बोललो आहे. मुख्य सचिव, जिल्हाधिकाऱ्यांमार्फत कामं होतील, त्यांना सूचना दिल्या आहेत. कुठे काही कमी पडणार नाही, याची काळजी घेऊ. आम्ही नुकसान भरपाई देण्याचे काम करु. पंचनामे करण्याच्या सूचना देखील दिल्या आहेत. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, निवडणुका होत राहतील", अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.

## उरणमध्ये अपघातात दोघांचा मृत्यू

■उरण, नितीन देवळेकर :
उरण रेल्वे स्थानकातून रात्रीच्या ११.३० वाजता दुचाकीवरून जात असताना वेगवान वाहनाने जोराची धडक देत दुचाकीवरील तिघांना चिरडले. या अपघातात उपचारादरम्यान पवित्र बराल (४०) व रश्मिता बराल (३७) या पती-पत्नीचा मृत्यू झाला आहे. तर ४ वर्षांच्या मुलीवर रुग्णालयात उपचार सुरू असून ती मृत्यूशी झुंज देत आहे. या घटनेची उरण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी वाहनचालक जय चंद्रहास घरत याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेबाबत उरणच्या नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात असून या घटनेला जबाबदार असलेल्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. यासंदर्भात जनवादी महिला संघटनेने उरण पोलिसांना निवेदन देत कारवाईची मागणी केली आहे. संघटनेच्या नेत्या हेमलता पाटील व कामगार नेते कॉ. भूषण पाटील, इतर पदाधिकारी उपस्थित होते. अपघात इतका भयानक होता की यामध्ये दुचाकीचे तुकडे झाले आहेत. या अपघातानंतर रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानाने पोलिसांत फिर्याद दाखल केली असून चालकाने या जवानाला शिवीगाळ केल्याचे म्हटले आहे. या भीषण अपघातानंतर उरण स्थानक परिसरात ये-जा करणाऱ्या प्रवासी आणि वाहनचालकांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे.

## बँकेच्या कॅश वाहनाला निवडणूकीचा फटका
### उल्हासनगरमध्ये भरारी पथकाने घेतली गाडीच ताब्यात

■ उल्हासनगर,प्रतिनिधी,
निवडणुकीच्या कालावधीत कॅशवर व इतर बाबींवर लक्ष ठेवण्यासाठी नेमण्यात आलेल्या भरारी पथकाने कॅशच्या क्यूआर कोडची तफावत असलेल्या एका बँकेची गाडी ताब्यात घेतली. या गाडीत १ कोटी ८ लाख रूपयांच्यावर कॅश मिळून आली.इन्कम टॅक्सने कॅश मोजून ती जप्त करण्याची गरज नसल्याचा सकारात्मक अहवाल दिला.तरी कॅश सिजर रिलीज़ कमिटीला रिपोर्ट सादर केलेला असल्याने कॅश परत मिळण्यास विलंब होत आहे.

उल्हासनगरात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर ९ भरारी पथके नेमण्यात आली आहेत.त्यातील एक भरारी पथक प्रमुख अजित घोरपडे, सचिन वानखेडे व पोलीस किशोर वंजारी यांनी दोन दिवसांपूर्वी सेंचुरी कंपनीजवळ सीएमएस बँकेची गाडी अडवली. गाडीत मोठ्या प्रमाणावर कॅश असल्याने पथकाने क्यूआर कोडची मागणी केली. मात्र त्यांच्याकडून खात्रीशीर उत्तर मिळाले नसल्याने सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विजयानंद शर्मा यांच्या आदेशानुसार ती गाडी ताब्यात घेऊन उल्हासनगर पोलीस ठाण्यात नेण्यात आली.त्यानंतर इन्कम टॅक्स विभागाला बोलवण्यात आले.




गाडीतील कर्मचाऱ्यांकडे काही रुपयांच्या कॅशचा क्यूआर कोड होता. मात्र सकाळपर्यंत मोजणी करण्यात आली असता गाडीत १ कोटी ८ लाखांच्यावर कॅश मिळून आली. इन्कम टॅक्स विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्व गोष्टी पडताळून ताब्यात घेतलेली कॅश जप्त करण्याची गरज नसल्याचा रिपोर्ट दिला. इन्कम टॅक्स विभागाने क्लिअरन्स सर्टिफिकेट दिलेले असले तरी जिल्हास्तरावर कॅश सीजर रिलीज़ कमिटी असून त्यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

त्यांच्याकडून आदेश आल्यावर कॅश रिलीज़ करण्यात येणार असल्याची माहिती सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी विजयानंद शर्मा यांनी दिली. आता कॅश असलेली गाडी बँकेला परत केव्हा मिळणार याची चर्चा सुरू आहे.

## पुणेकरांकडून चार दिवसांत ४०० पाणीपुरवठ्याच्या तक्रारीं


■ पुणे, अभिजीत येरुल्लू:
पिण्याच्या पाण्याची मागणी वाढत असताना दुसऱ्या बाजूला पुरवठा आहे तेवढाच राहिल्याचा थेट परिणाम पाणीपुरवठा विस्कळीत होण्यावर झाला आहे. गेल्या चार दिवसांत तब्बल ४०० तक्रारींची नोंद महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे झाली असून गेल्या चार दिवसांत तक्रारींचे प्रमाण सरासरी ३५ ते ४० टक्क्यांनी वाढले आहे.

दरम्यान, टँकरद्वारे होणाऱ्या पाण्याच्या काळ्याबाजारासंदर्भात दोन तक्रारी प्रशासनाकडे आल्या आहेत. उन्हाच्या वाढत्या झळांमुळे पिण्याच्या पाण्याच्या मागणीत वाढ झाली आहे. शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी प्रतिदिन १,६५० ते १,७०० दशलक्ष लिटर पाणी धरणातून घेतले जात आहे. गेल्या पंधरा ते वीस दिवसांत प्रतिदिन ८० ते १०० दशलक्ष लिटर अधिकचे पाणी महापालिका धरणातून उचलत आहे. पाणी जास्त उचलल्यावर पुरवठा व्यवस्थित व्हावा, अशी अपेक्षा असताना शहरातील अनेक भाग तहानलेलेच असल्याचे चित्र आहे. त्यात गेल्या चार दिवसांपासून आणखी भर पडली आहे.

विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे मोठ्या प्रमाणावर येण्यास सुरुवात झाली आहे. फुरसुंगी, उरूळी, हडपसर, वडगावशेरी, पाषाण, औंध, धनकवडी, सुखसागरनगर, बालाजीनगर, आंबेगाव, धायरी, नऱ्हे या भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

ह्यापाणीपुरवठ्याच्या तक्रारीत ३५ ते ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या चार दिवसांत ४०० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. पिण्याच्या पाण्याची मागणी वाढली असली तरी धरणातून वाढीव पाणी घेण्यास मयार्दा आहेत. त्यामुळे तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. विस्कळीत पाणीपुरवठा होत असलेल्या भागाला टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे,ह्न अशी माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी दिली.

## शेअर बाजारातील व्यवसायासाठी बँक खाते उघडून न दिल्याने अपहरण




■मुंबई, विशाल पाटील,
शेअर बाजारातील व्यावसायासाठी बँकेत चालू (करंट) खाते उघडून न दिल्यामुळे संतापलेल्या चौघांनी २३ वर्षांच्या तरुणाचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला. मात्र वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा प्रयत्न फसला. याप्रकरणी तीन अपहरणकर्त्यांना पोलिसांनी अटक केली असून त्यांचा मुख्य सहकारी अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला. तुषार चाकोरकर, दिलखुश तेली आणि पवन कीर अशी या तिघांची नावे असून त्यांच्याविरुद्ध अपहरणासह शिवीगाळकरुन ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुळचा बिहारमधील रहिवासी असलेला सोनू संजय सिंहा (२३) सध्या त्याच्या मित्रासोबत गोरेगाव येथील बालाजी चाळीत वास्तव्यास आहे. त्याची व्ही. आर. सर्व्हिस एचआर नावाची प्लेसमेंट कंपनी असून या कंपनीचे कार्यालय गोरेगावमधील बांगुरनगर मेट्रो स्थानकाजवळ आहे. फेब्रुवारी महिन्यांत त्याच्या कार्यालयात तुषार आणि सौरभ आले होते. या दोघांनाही शेअर बाजारात व्यवसाय सुरू करायचा होता.

मात्र मुंबईचे रहिवासी नसल्याने त्यांना बँकेत चालू खाते उघडता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी सोनूला त्यांच्यासाठी चालू खाते उघडून देण्याची विनंती केली. तसेच त्याला ठराविक रक्कम कमिशन म्हणून देण्याचे मान्य केले. त्यामुळे सोनूने त्यांना त्याच्याच कंपनीच्या नावाने दोन चालू खाती उघडून दिली. दोन खाती उघडून दिल्यानंतरही ते दोघेही आणखी एक चालू खाते उघडून देण्यास त्याला सांगत होते. हा प्रकार संशयास्पद वाटल्याने त्याने त्यांना नकार दिला.

६ एप्रिलला तुषारने त्याला प्लेसमेंट कामासाठी बोरिवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ बोलाविले. त्यामुळे तो व त्याचा मित्र विकास रात्री १० वाजता तेथे गेले होते. यावेळी सौरभ आणि तुषारने त्याच्याशी चालू खाते उघडून देण्याबाबत वाद घातला. त्याला शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी त्यांच्यासोबत इतर दोन तरुण होते. काही वेळानंतर या चौघांनी सोनूला एका मोटरीत बसवून त्याचे अपहरण केले. हा प्रकार तेथे उपस्थित नागरिकाच्या निदर्शनास आला. मात्र त्यांनी आमच्यात आर्थिक वाद आहे. त्यामुळे तुम्ही आमच्या वादात पडू नका, अशी धमकी या चौघांनी नागरिकांना दिली.

काही वेळानंतर ते चौघेही सोनूला घेऊन दहिसरच्या दिशेने निघून गेले होते. दहिसर चेकनाका आल्यानंतर सोनूने आरडाओरड केल्याने तेथे काही वाहतूक पोलीस आले. त्यांनी त्यांची मोटरगाडी अडविण्याचा प्रयत्न केला. या गोंधळात सौरभ तेथून पळून गेला, तर इतर तिघांना पळून जाताना वाहतूक पोलिसांनी पकडले.

## उड्डाणपुलाचे काम १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करण्याचा निर्धार
### महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्याकडून पाहणी

■ ठाणे,भावना जैन,
ठाणे पूर्व भागातील वाहतूकीच्या सुरळीत संचलनासाठी महत्त्वाचा ठरणाऱ्या, स्टेशन परिसर विकास सुधारणा योजने अंतर्गत बांधण्यात येत आहे. या उड्डाणपुलाचे काम १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या कामाच्या प्रगतीची पाहणी शनिवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली.स्मार्ट सिटीचा हा प्रकल्प असून एकूण २.२१ किमी अंतराच्या या उड्डाणपुलाचा कन्हैयानगर ते सिद्धार्थनगर हा टप्पा पूर्ण झाला आहे. त्यापुढील काम तसेच, कोपरी येथे रेल्वे मार्गावरील काम शिल्लक



असून त्याचे काम युद्ध पातळीवर सुरू करण्यात आले आहे. भुयारी मार्ग ते सेवा रस्ता हा भाग अंतिम टप्प्यात आहे. आयुक्त राव यांनी कन्हैयानगर येथे या संपूर्ण प्रकल्पाचे आरेखन समजून घेतले. त्यातील रेल्वे मार्फत केल्या जाणाऱ्या कामाची माहिती घेतली. त्यानंतर, उड्डाणपुलाच्या तयार झालेल्या भागाची पाहणी केली. तसेच स्टेशन परिसरातील बांधकामाच्या स्थितीचाही उड्डाणपुलावरून आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, मुख्य तांत्रिक अधिकारी प्रवीण पापळकर, उपनगर अभियंता शुभांगी केसवानी, कार्यकारी अभियंता धनंजय मोदे,सुधीर गायकवाड आदी अधिकारी उपस्थित होते.

◆त्यानंतर आयुक्त राव यांनी कोपरी विसर्जन घाट, उद्यान, अँपी थिएटर यांना भेट दिली .तसेच, नवीन ठाणे रेल्वे स्थानक, सभोवतालचा परिसर येथील बांधकामाच्या स्थितीचीही आयुक्तांनी पाहणी केली . या कामातील अडचणी, रेल्वेकडून अपेक्षित कामे, प्रकल्पबाधित कुटुंबाचे स्थलांतर यासंदर्भात लवकरच बैठक आयोजित केली जाणार असल्याचे राव यांनी स्पष्ट केले .

## त्वचेच्या संसर्गापासून मुक्ती मिळवण्यासाठी घरगुती उटणे



**साहित्य :**
एक वाटी मसूर डाळीचे पीठ, कच्चे तांदूळ एक चतुर्थांश कप, आठ बदाम, अर्धा कप गव्हाचा सांजा, चिमूटभर हळद, गुलाबपाणी

**कृती व वापरण्याची पद्धत**
▮ मसूर डाळ, तांदूळ आणि बदाम बारीक वाटून त्याची पूड तयार करा. ▮ या पावडरमध्ये गव्हाची भरड आणि हळद घाला. ▮ या मिश्रणात पाणी किंवा गुलाबपाणी घालून पेस्ट बनवा. ▮ ही पेस्ट चेहरा, मान आणि हातावर लावा. ▮ वाळल्यावर पाण्याने धुऊन घ्या. ▮ आठवड्यातून एकदा या उटण्याचा वापर करावा.

**हे कसे कार्य करते?**
त्वचेच्या सौंदर्यवर्धनासाठी प्राचीन काळापासून उटण्यांचा वापर केला जात आहे. हे त्वचेवरील घाण दूर करण्यास मदत करतं. हळदीत आढळणाऱ्या अँटिसेप्टिक गुणधर्मामुळे त्वचेचं संसर्गापासून संरक्षण होतं. बदाम त्वचेचं पोषण करून रंग उजळण्यास मदत करतो.

## ...तर तुमचा टॉवेल बनू शकतो तुमच्या त्वचेचा शत्रू

**अंघोळ केल्यानंतर मिळणारा फ्रेशनेस कशातच नाही. दिवसातून किमान एकदा तरी आपण अंघोळ करतो. अंघोळ केल्यानंतर अंग पुसण्यासाठी आपण टॉवेलचा उपयोग करतो. तुम्ही वापरत असलेला टॉवेल तुमचे शरीर पुसण्याचे काम करतो, पण याशिवाय तुमच्या शरीरावरील मळ काढण्यासही मदत करतो. पण जर तुम्ही तुमच्या टॉवेलची योग्य काळजी घेतली नाही तर मात्र हाच टॉवेल तुमच्या त्वचेचा शत्रू बनू शकतो. आज आम्ही तुम्हाला याबद्दल अधिक माहिती देणार आहोत. त्यामुळे तुम्हीही टॉवेल कसाही वापरत असाल तर हे नक्की वाचा.**

**टॉवेलची स्वच्छता**
काही जणांना टॉवेल सतत धुण्याची गरज नसते, असे वाटते. तुम्ही असा विचार करत असाल तर तो अगदीच चुकीचा आहे. कारण तुम्ही अंघोळ केल्यानंतर तुमच्या शरीरावर साचलेला मळ काढला जातो. त्यामुळे साहजिकच तुमचा मळ टॉवेलवर साचतो. अशावेळी जर तुम्ही हा टॉवेल सतत वापरत राहिलात तर तुमच्या त्वचेवरही मळ साचत राहील. त्यामुळे तुम्हाला स्वच्छ करणाऱ्या टॉवेलची स्वच्छताही तितकीच महत्त्वाची आहे. आठवड्यातून किमान दोन वेळा तरी तुमचा टॉवेल धुणे अपेक्षित असते. जर तुमचा टॉवेल पातळ असेल तर तुम्ही तो रोज धुतला तर फारच उत्तम.

**आता आली फेकून देण्याची वेळ**
टॉवेल कितीही चांगला वाटत असला तरी त्याला वापरण्याचीही काहीतरी मर्यादा आहे. तुम्ही वर्षानुवर्षे एकच टॉवेल वापरू शकत नाही. तुम्हाला कालांतराने टॉवेल फेकण्याचीही गरज असते. तुम्ही कॉटन किंवा टर्किश कोणताही टॉवेल वापरत असाल तरीदेखील तुम्ही हा टॉवेल सहा महिन्यांनी काढून टाकायला हवा. जास्तीत जास्त सहा महिने आणि कमीत कमी ३ महिने तुम्ही टॉवेल वापरायला हवा.

**टर्किश की कॉटन टॉवेल**
तुमची त्वचा ही फारच नाजूक असते. कोणतेही कॉस्मेटिक वापरताना तुम्ही अगदी पारखून सगळ्या गोष्टी तपासता. पण मग टॉवेलबाबतीत का नाही? तुम्हाला लवकर वाळणारा टॉवेल हवा असेल तर तुम्ही पंचा किंवा पातळ टॉवेलची निवड करा. जर तुम्हाला मऊ असा टॉवेल हवा असेल तर तुम्ही टर्किश टॉवेलचा वापर करा. आता तुमच्या आवडीवर टॉवेलची निवड अवलंबून आहे.





**सूर्यप्रकाश महत्त्वाचा**
अनेकांना टॉवेल वाळत घालण्याचा कंटाळा असतो. पण तुमच्या टॉवेलसाठी सूर्यप्रकाश महत्त्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही तुमचा टॉवेल सूर्यप्रकाशात वाळत घालायला हवा. कारण जर त्या टॉवेलवर काही जंतू असतील आणि तुम्हाला टॉवेल धुणे शक्य नसेल अशावेळी कडकडीत उन्हात टॉवेल ठेवल्यामुळे त्यावरील जीवाणू कमी होतात.

**एकटयाने वापरण्याचा गरज**
शेअरिंग-केअरिंगमध्ये तुम्ही एकाच टॉवेलचा दोन ते तीन जण वापर करत असाल तर ते तुमच्या त्वचेसाठी फारच वाईट आहे. कारण दोन ते तीन जणांनी एकच टॉवेल वापरला तर तुम्हाला संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे तुम्ही कधीही एकच टॉवेल दोन ते तीन जणांमध्ये वापरू नका. तुम्हाला त्वचा विकार जडण्याची शक्यता यामध्ये अधिक असते. आता तुम्हाला टॉवेल हा अंघोळीपुरता वाटत असला तरी त्याचे महत्त्व काय ते नक्कीच कळलं असेल, त्यामुळे यापुढे याची अधिक खबरदारी घ्या.

## जास्त मीठ खाल्ल्याने होऊ शकतो मधुमेह



**मधुमेहापासून** स्वतःला दूर ठेवायचे असेल तर केवळ साखर खाणे सोडून चालणार नाही. कारण, नुकत्याच करण्यात आलेल्या एका नव्या संशोधनानुसार जास्त मीठ खाणेही बनू शकते मधुमेहाचे कारण. संशोधकांच्या मते जास्त मीठ म्हणजे सोडियम खाल्ल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते.

मात्र, आता नव्या संशोधनामुळे जास्त मीठ खाणे हे कारण मधुमेह हा आजार होण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडते. लिस्बनमध्ये आयोजित युरोप असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ डायबेटिसच्या वार्षिक बैठकीत यासंबंधी माहिती देण्यात आली. जे लोक दिवसभरात २.५ ग्रॅमपेक्षाही जास्त मीठ खातात, त्यांना टाइप २ डायबेटिसचा धोका ४३ टक्क्यांहून अधिक असतो. तसेच शरीराच्या आवश्यकतेपेक्षा ७.३ ग्रॅम जास्त मीठ खात असाल, तर टाइप २ डायबेटिसचा धोका वाढून तो ७२ टक्क्यांवर पोहोचतो.

## शरीरासाठी अतिशय घातक आहे साबुदाणा;
### उपवास, व्रत-वैकल्यांसाठी वापरण्याआधी जाणून घ्या गुणधर्म



**हिंदू** धर्मासह इतरही धर्मांत अनेक सण-उत्सव, व्रत-वैकल्ये केली जातात, उपवास ठेवले जातात. यामध्ये एक समान गोष्ट असते ती म्हणजे उपवासाचे पदार्थ. उपवासादरम्यान जवळजवळ सर्व घरांत हमखास वापरण्यात येणारा पदार्थ म्हणजे साबुदाणा. तसाही साबुदाणा पूर्ण वर्षात विविध कारणांनी वापरला जातो, अनेक ठिकाणी साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडे हे नाश्त्याचे पदार्थ म्हणून त्याला पसंती दिली जाते. मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारा साबुदाणा आपल्या शरीरासाठी लाभदायक आहे का, याचा कधी विचार केला आहे?

**साबुदाणा शरीरासाठी आहे अतिशय घातक, तुम्हीच पाहा कारणे –**

▮ साबुदाण्याचा जन्म हा इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स या देशांत झाला. साबुदाणा हा सागो झाडांपासून कृत्रिमरीत्या तयार केला जातो. यामध्ये कर्बोदकांचे प्रमाण अतिशय जास्त आहे, त्यामुळे वजन वाढण्यासाठी हा कारणीभूत ठरू शकतो.

▮ १०० ग्रॅम साबुदाण्यामध्ये मध्ये ९४ ग्रॅम कर्बोदके, ०.२ ग्रॅम प्रथिने, ०.५ ग्रॅम तंतुमय घटक व फक्त १० ग्रॅम कॅल्शिअम असते. यावरून लक्षात येते की शरीरासाठी (वजन वाढवण्याखेरीज) तसा या पदार्थाचा काहीच उपयोग नाही.

▮ साबुदाण्यापासून पदार्थ बनवण्यासाठी त्यात जे पदार्थ वापरले जातात, त्यामध्ये बटाटा, शेंगदाणे कुट व इतर काही घटकांचा समावेश असतो. हे घटक पचायला अतिशय जड असतात यामुळे पित्त वाढणे, पोट फुगणे, पोट दुखणे, भूक मंदावणे अशा समस्या उद्‌भवतात.

▮ साबुदाणा आतड्यातील सर्व द्राव शोषून घेत असल्याने आपली मलप्रवृती सुद्धा कठीण होते. तसेच साबुदाण्यामुळे पित्ताचा त्रासही वाढतो.

अशाप्रकारे ज्या दिवशी हलका आणि प्रमाणात आहार घ्यायचा त्याच दिवशी, म्हणजे उपवासाच्या दिवशी आपण साबुदाण्यासारखा जड पदार्थ खाऊन स्वतःच्या शरीराचे नुकसान करून घेत आहोत. त्यामुळे वेळीच सावध व्हा व साबुदाण्याचा जितका हवा तितकाच वापर करा.

**आयुर्वेदानुसार मनुकांमध्ये भरपूर मात्रेत औषधी गुण असतात. आम्हाला रोज ४-५ मनुका खायलाच पाहिजे. मनुकांना सर्दी-खोकला आणि कफ दूर करण्याचे सर्वात उत्तम औषध मानले जाते. त्याशिवाय देखील मनुकांचे बरेच फायदे असतात. त्यात उपस्थित न्यूट्रिएंट्स बऱ्याच आजारांमध्ये फायदेशीर ठरतात. तर जाणून घेऊ रोज मनुका खाण्याचे काय फायदे आहेत...**

## रोज करा ५ मनुकांचे सेवन आणि बघा त्याचे फायदे



▮ मनुका खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन इम्प्रुव्ह होते. यामुळे त्वचेची रंगत वाढते आणि रंग देखील निखरण्यास मदत होते.
▮ मनुकांमध्ये फायबर्स असतात. हे डायजेशन योग्य ठेवण्यास मदत करतात.
▮ यात पोटॅशियमची मात्रा जास्त असते. मनुका हार्ट अॅटॅकच्या आजारांमध्ये इफेक्टिव्ह आहे.
▮ यात आयर्न असतं. हे अॅनिमिया (रक्ताची कमतरता) दूर करण्यास फायदेशीर ठरतात.
▮ यात अँटीऑक्सिडेंट्स असतात. यामुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांपासून बचाव होण्यास मदत मिळते.
▮ यात अँटीबॅक्टेरियल गुण असतात. यामुळे सर्दी-खोकला ठीक होण्यास मदत मिळते.
▮ यात बीटा कॅरोटिन असते, जे डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतं.
▮ यात ऑक्झेलिक अॅसिड असतं. यामुळे दात मजबूत होतात. यामुळे गम प्रॉब्लेमपासून बचाव होतो.
▮ यात कॅल्शियमची मात्रा अधिक असते. म्हणून जॉइंट पेनपासून बचाव होतो.
▮ याचे सेवन केल्याने बॉडीचे टॉक्सिन्स दूर होऊन हेअर फॉलची समस्या देखील दूर होते.

**मनुका खाण्याचे हेल्दी मार्ग**
▮ कब्ज दूर करण्यासाठी रात्री पाच मनुका आणि एक लसणाची कळी खायला पाहिजे.
▮ मनुकांत मध मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.
▮ याला दुधात उकळून त्याचे सेवने केल्याने देखील फायदा होतो.
▮ मनुकांमध्ये बडिशेप आणि ओवा मिसळून खाल्ल्याने देखील फायदा होतो.

## रितेश देशमुखने मुलांसह उभारली गुढी, जिनिलीया व्हिडीओ शेअर करत म्हणाली, "पहाटे आमची..."



हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा साजरा केला जातो. त्याप्रमाणे आज सर्वत्र गुढीपाडवा साजरा केला जात आहे. घरोघरी गुढ्या उभारल्या जात आहेत. गोडाधोडाचे पदार्थ करून हिंदू नववर्ष साजरं होतं आहे. महाराष्ट्राचं लाडकं कुटुंब म्हणजे देशमुख कुटुंबाची गुढी उभारली आहे. देशमुखाची लाडकी सून, अभिनेत्री जिनिलीया देशमुखने गुढीला सजवतानाचा व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना गुढीपाडव्याचा शुभेच्छा दिल्या आहेत. जिनिलीया देशमुखने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये रितेश देशमुख आपल्या लाडक्या मुलांबरोबर रिआन व राहिलासह गुढीला सजवताना दिसत आहे. हा व्हिडीओ शेअर करत जिनिलीयाने लिहिलं आहे, "पहाटे आमची गुढी तयार होतं आहे. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा." एवढंच नाहीतर जिनिलीयाने गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देत रितेशबरोबरचा एक मजेशीर व्हिडीओ देखील शेअर केला आहे. दरम्यान, रितेश-जिनिलीयाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, फ्रेबुवारीमध्ये 'राजा शिवाजी' या चित्रपटाची रितेशने घोषणा केली. या चित्रपटाचं दिग्दर्शन तो स्वतः करणार आहे. तसेच या चित्रपटाच्या निर्मितीची धुरा जिनिलीया सांभाळणार आहे. २०२५ला 'राजा शिवाजी' चित्रपट मराठी व हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ५२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | 4 | 8 | | | | | |
| 8 | | 3 | 9 | | | 6 | 7 | 4 |
| | | | | | | 2 | | 1 |
| 1 | 8 | | | | | | 9 | 3 |
| 2 | | | 1 | 7 | | 4 | | 6 |
| | 6 | 7 | | | 3 | | | 2 |
| | | 8 | 4 | | 2 | | | 5 |
| | | | 6 | | | 3 | | |
| | 9 | 2 | | 3 | 5 | 1 | | |

### उत्तर सुडोकू -५१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | 3 | 6 | 5 | 8 | 9 | 2 | 1 |
| 6 | 8 | 1 | 7 | 9 | 2 | 3 | 5 | 4 |
| 9 | 2 | 5 | 3 | 1 | 4 | 8 | 6 | 7 |
| 8 | 9 | 4 | 1 | 2 | 7 | 6 | 3 | 5 |
| 2 | 3 | 6 | 4 | 8 | 5 | 7 | 1 | 9 |
| 5 | 1 | 7 | 9 | 3 | 6 | 2 | 4 | 8 |
| 7 | 5 | 9 | 2 | 4 | 3 | 1 | 8 | 6 |
| 1 | 4 | 2 | 8 | 6 | 9 | 5 | 7 | 3 |
| 3 | 6 | 8 | 5 | 7 | 1 | 4 | 9 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## 'माझी तुझी रेशीमगाठ' फेम मायरा वायकुळ लवकरच होणार मोठी ताई, स्वतःच दिली आनंदाची बातमी

'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेतून घराघरात पोहोचलेली मायरा वायकुळ नेहमी चर्चेत असते. कधी तिच्या कामामुळे तर कधी तिच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे. मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय बालकलाकारांपैकी मायरा एक आहे. लहान वयातच तिने आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं आहे. आता मायराने सिनेसृष्टीतही पदार्पण केलं आहे. तिचा पहिला-वहिला मराठी चित्रपट 'नाच गं घुमा' लवकरच भेटीस येणार आहे. अशातच मायराने एक आनंदाची बातमी दिली आहे. मायरा वायकुळच्या सोशल मीडियावर काही फोटो शेअर करण्यात आले आहेत; ज्यामधून आनंदाची बातमी जाहीर करण्यात आली आहे. पहिल्या




फोटोमध्ये मायराच्या हातात पाटी दिसत आहे, ज्यावर लिहिलं आहे, 'माझ्याकडे एक गुपित आहे.' दुसऱ्या फोटोमध्ये मायरा आणि तिचे आई-वडील पाहायला मिळत आहेत. या फोटोतील पाटीवर लिहिलं आहे, 'मी आता लवकरच मोठी बहीण होणार आहे.' तिसऱ्या फोटोमधून वायकुळ कुटुंबात गोंडस बाळाचं आगमन कधी होणार, तो महिना जाहीर करण्यात आला आहे. सप्टेंबर २०२४मध्ये मायराच्या घरी पाळणा हलणार आहे आणि मायरा मोठी ताई होणार आहे.

## तुकोबांचे अभंग जीवनास देती रंग

ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस... किंवा वृक्षवल्ली आंम्हा सोयरी वनचरे ` पक्षीही सुस्वरे आळविती असे अनेक अभंग जगतगुरू संत तुकाराम महाराज यांनी लिहिले आहेत. तुकोबांचे अभंग म्हणजे प्रपंच आणि परमार्थांचा मनोज्ञ समन्वय घालून देणारे ते अदभूत शास्त्र आहे. मानवी विचाराच्या विविध स्तरावरून जीवनामध्ये निर्माण झालेल्या आणि होणाऱ्या विविध समस्याची चपखल आणि समाधानपूर्वक उकल करून मानवी जीवनाला परिपूर्णता प्राप्त करून देणारा तो एक सुखसंवाद आहे. वारकरी संत परंपरेचा कळसाध्याय ठरलेले संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे तुकाराम बीज आहे. संत तुकाराम महाराज सतराव्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवणारे निर्भीड कवी होते. समाजाच्या तळागाळातील लोकांनाही सहज उमजतील, अशा संतरचना तुकारामांनी केल्या. श्रीरामाने शरयू नदीत देह समर्पित केला, तर श्रीकृष्णाने पारध्याचा बाण लागल्यानंतर तोही सदेह अनंतात विलीन झाला. सदेह वातावरणात म्हणजेच पंचमहाभूतांत गेलेले हे दोन्ही अवतार होते; परंतु, मानव असूनही सदेह वैकुंठगमनाचे सामर्थ्य दर्शवणारे संत तुकाराम महाराज हे एकमेव होते. चारचौघांप्रमाणे सामान्य जीवन वाट्याला आलेले असूनही तुकोबांनी आपत्तींनी घेरलेल्या जगण्यातील वेगळा अर्थ सर्वांना समजावून सांगितला. व्यवहाराची थोर शिकवण शब्दाशब्दांतून देत असतानाच भक्तीचे रहस्य सहज उलगडून दाखविले. संसारात वावरत असताना येणाऱ्या सुख-दुःखांना काही अंतरावर कसे ठेवावे, गुंतून न राहताही संसार कसा करता येतो त्याचे मार्गदर्शन संत तुकाराम महाराजांनी केले.

## दिनविशेष

### १० एप्रिल

- १९१२: इंग्लंडमधील साऊथॅम्प्टन बंदरातून टायटॅनिक जहाजाने पहिल्या आणि शेवटच्या प्रवासाला सुरवात केली.
- १९५५: योहान साल्क यांनी सर्वप्रथम पोलिओ लसीची यशस्वी चाचणी केली.
- १९७०: पॉल मेकार्टनीने व्यक्तिगत आणि व्यावसायिक कारणास्तव द बीटल्स सोडण्याचे जाहीर केले.
- १९१७: गांधी चंपारण्याला आगमन
- १७५५: होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हानेमान यांचा जन्म. (मृत्यू: २ जुलै १८४३)
- १८४३: विविध ज्ञानविस्तार मासिकाचे संपादक रामचंद्र गुंजीकर यांचा जन्म. (मृत्यू: १८ जून १९०१)
- १८४७: हंगेरियन-अमेरिकन राजकीय नेते आणि पुलित्झर पुरस्कारांचे प्रवर्तक जोसेफ पुलित्झर यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑक्टोबर १९११)
- १८८०: वृत्तपत्रकार तसेच उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री सर सी. वाय. चिंतामणी यांचा जन्म. (मृत्यू: १ जुलै १९४१)
- १८९४: बिर्ला उद्योगसमूहाचे संस्थापक घनश्यामदास बिर्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १९८३)
- १८९७: भारतीय लेखापाल आणि राजकारणी प्रफुल्लचंद्र सेन यांचा जन्म. (मृत्यू: २५ सप्टेंबर १९९०)
- १९०१: अर्थशास्त्रज्ञ, भारतीय अर्थशास्त्राचे प्रणेते, सहकारी चळवळीचे खंदे समर्थक, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. धनंजय रामचंद्र तथा द. रा. गाडगीळ यांचा जन्म. (मृत्यू: ३ मे १९७१)
- १९०७: नाटककार, चित्रपट दिग्दर्शक आणि पत्रकार मो. ग. रांगणेकर यांचा जन्म. (मृत्यू: १ फेब्रुवारी १९९५)
- १९१७: भारतीय राजकारणी जगजितसिंह लयलपुरी यांचा जन्म. (मृत्यू: २७ मे २०१३)
- १९२७: भारतीय खगोलशास्त्रज्ञ मनाली कल्लट तथा एम. के. वैणू बाप्पा यांचा जन्म. (मृत्यू: १० ऑगस्ट १९८२)
- १९३१: शास्त्रीय गायिका किशोरी आमोणकर यांचा जन्म.
- १९५२: भारतीय राजकारणी नारायण राणे यांचा जन्म.
- १९७२: स्काईप चे सहसंस्थापक प्रेसिंड कासासुलु यांचा जन्म.
- १९७५: भारतीय नर्तक आणि कोरिओग्राफर टेरेंस लुईस यांचा जन्म.
- १३१७: संत गोरा कुंभार समाधिस्थ झाले.
- १६७८: रामदास स्वामींची लाडकी कन्या वेणाबाई यांचे निधन.
- १८१३: इटालियन गणितज्ञ जोसेफ लाग्रांगे यांचे निधन. (जन्म: २५ जानेवारी १७३६)
- १९३१: लेबनॉनमध्ये जन्मलेले अमेरिकन कवी आणि लेखक खलील जिब्रान यांचे निधन. (जन्म: ६ जानेवारी १८८३)
- १९३७: ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे निधन. (जन्म: २ फेब्रुवारी १८८४ झ्र रायपूर, मध्य प्रदेश)
- १९४९: पुरावनस्पती शास्त्रज्ञ राष्ट्रीय विज्ञान अकादमीचे अध्यक्ष बिरबल सहानी यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १८९१ झ्र सहारणपूर, उत्तर प्रदेश)

## भविष्य

**मेष** – तुमच्या व्यक्तिमत्वाची उत्तम छाप पडेल. व्यापारी वर्गाला चांगला आर्थिक लाभ होईल. नवीन मित्र जोडाल. झोपेची तक्रार जाणवेल.

**वृषभ** – व्यवहारी बुद्धिमत्ता वापराल. व्यावहारिक कल्पकता वापराल. पुढील गोष्टींचा अंदाज बांधवा लागेल. काही बाबी

**मिथुन** – मनातील आकांक्षा पूर्ण होतील. चांगली संगत लाभेल. कामाच्या ठिकाणी कौतुकास पात्र व्हाल. मोठ्या लोकांच्या संगतीत वावराल.

**कर्क** – मानसिक ताणापासून दूर राहावे. घरातील वडीलधार्या व्यक्तींचे मत विरोधी वाटू शकते. अंगीभूत कलागुण विकसित होण्यास वाव द्यावा. अति विचार करणे टाळावे.

**सिंह** – जोडीदाराशी विचार-विनिमय कराल. भागीदारीत नवीन योजना आमलात आणाल. मुलांच्या हट्टीपणा कडे लक्ष ठेवा. तुमच्यातील धार्मिकता वाढीस लागेल. इतरांच्या आनंदात

**कन्या** – पत्नीची प्रगती होईल. तुमचा जनसंपर्क वाढेल. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. जुगारातून लाभ संभवतो. गुंतवणुकीचा नवीन पर्याय शोधाल.

**तुला** – पत्नीचा वरचष्मा राहील. जोडीदाराचा लाडिक हट्ट पुरवावा लागेल. आरोग्यात सुधारणा होईल. जवळचा प्रवास जपून करावा. कामाचा जोम वाढेल.

**वृश्चिक** – बोलतांना सारासार विचार करून बोलावे. कसलाही उतावीळपणा करायला जाऊ नये. कौटुंबिक खचार्चे योग्य नियोजन करावे. घरात नातेवाईक जमा होतील. दिवस हसत-खेळत घालवाल.

**धनु** – रागाचा पारा आवरता घ्यावा लागेल. आततायीपणे वागू नये. कामाचा जोम वाढीस लागेल. काही अनपेक्षित बदल संभवतात. नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे.

**मकर** – सामुदायिक गोष्टीपासून दूर राहावे. स्त्रीवगार्पासून सावधानता बाळगावी. धार्मिक यात्रा कराल. प्रवासात सावधानता बाळगावी लागेल. वादविवादात सामील होणे टाळा.

**कुंभ** – मनमोकळ्या गप्पा मारता येतील. तुमच्या संभाषण कौशल्यावर सर्व खुश होतील. व्यावहारिक चातुर्य दाखवून द्याल. कौटुंबिक जबाबदारी पेलाल. हातातील कला जोपासावी. पोटाच्या तक्रारी जाणवू शकतात.

**मीन** – वेळेचे महत्व जाणून वागावे. कोणालाही शब्द देतांना विचार करावा. व्यावसायिक लाभाचे योग्य नियोजन करावे. चटपटीत पदार्थ खाल. आवडी-निवडी बाबत दक्ष राहाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# कॅच देम यंग!

मतदानाला पात्र असलेल्या १८-१९ वयोगटातील तरुण -तरुणींपैकी जेमतेम ४० टक्के जणांचा मतदारयादीत समावेश झाला आहे. या उदासीनतेचे कारण काय, याचा शोध घ्यायला हवा. एकीकडे तमाम राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते पुढच्या काही दशकांतील विकासाचे, प्रगतीचे स्वप्न दाखवत आहेत आणि संधी मिळाल्यास ही स्वप्ने साकार करण्याचे आश्वासन देत आहेत. पण ज्यांच्यासाठी आणि काही प्रमाणात ज्यांच्या बळावर हे सगळे घडविले जाणार आहे, त्या तरुणांच्या मनात सध्या काय चालले आहे? त्यांना भारतातील राजकीय प्रक्रियेविषयी आस्था, स्वारस्य आहे की नाही? हे अगदी मुळातले वाटावेत असे प्रश्न उपस्थित होण्याचे कारण म्हणजे नुकतीच उपलब्ध झालेली मतदारांसंबंधीची आकडेवारी. जीवनातल्या पहिल्यावहिल्या मतदानाला पात्र असलेल्या १८-१९ वयोगटातील तरुण -तरुणींपैकी जेमतेम ४० टक्के जणांचा मतदारयादीत समावेश झाला आहे. या उदासीनतेचे कारण काय, याचा शोध घ्यायला हवा. भारत हा आज जगातल्या तरुण लोकसंख्येचा देश आहे. भारताने आगामी ५० वर्षांची दिशा या तरुण लोकसंख्येला केंद्रस्थानी ठेवून निश्चित करायला हवी, असे जगभरचे नियोजनकार सांगत असतात. जागतिक बॅंक असो, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी असो वा बड्या वित्तसंस्था असोत; एका स्वरात सांगत आहेत, की चीनची लोकसंख्या ज्येष्ठ होत चालली असून भारतातली बाळे वयात आली आहेत. या लोकसंख्येचा अर्थव्यवस्थेला मोठाच हातभार लागू शकेल, अशी स्थिती आहे. भारताच्या अर्थगाडयाची अश्वशक्ती होऊ शकणाऱ्या या तरुण लोकसंख्येचा नवे सरकार निवडून देणाऱ्या प्रक्रियेशी, लोकशाहीच्या उत्सवाशी फारसा संबंध नसल्याचे आकडेवारी सांगते. देशात १८ ते १९ या वयोगटातील लोकसंख्या ४.७ कोटी असावी, असा अंदाज आहे. प्रौढ मतदानाचा अधिकार हा देशाचा कारभार कुणाच्या हाती जाईल, देशाची आगामी पाच वर्षातील दिशा काय असेल ते ठरवत असतो. मतदान हे एका अर्थाने गैरकारभारावर, अव्यवस्थेवर नियंत्रण ठेवणारे शस्त्र आहे; तर दुसऱ्या अर्थाने नवनिर्मितीचे सर्जक आयुधही. मात्र या तरुण वर्गाला आपल्या मताची किंमत लक्षात येऊ नये, यादीत नाव नोंदवण्याची जागरुकता असू नये हे कशाचे निदर्शक आहे? योजनाकारांनी, राज्यकर्त्यांनी याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. या व्यवस्थेचा गाडा ज्या तरुणांनी पुढे न्यायचा आहे, त्यांना सरकार निवडण्याबद्दल आस्था का बरे नसावी? की भारतात कोणतेही सरकारी काम करायला जी कागदपत्रे नाचवावी लागतात त्याचा या पिढीला तिटकारा आहे? राजकीय पक्षांना, नेत्यांनाही नवमतदारांची नावे सामावून घेण्यासाठी जे सायास करावे लागतात ते करण्यासाठी वेळ काढणे, मोहीम राबवणे आवश्यक वाटत नाही का? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. नवमतदारांच्या नोंदणीबाबत नीचांकी राज्यांमध्ये महाराष्ट्र आहे. खरे तर अत्याधुनिक युगात वावरताना मतदारयाद्यांबाबतही कार्यक्षम यंत्रणा निर्माण करायला हवी. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अवलंबाने हे खरे तर एका 'क्लिक'वर होणेही शक्य आहे. आता जिल्हाधिकारी कार्यालये नवमतदारांच्या अल्प प्रतिसादाची चिंता करीत मोहीम राबवीत आहेत, हे खरे. पण हेच काम आधी झाले असते, तर युवकांचा सहभाग वाढू शकला असता. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांसाठी त्याच आवारात मतदारनोंदणी केंद्र सुरु करण्याचा सोपा पण अभिनव मार्ग चोखाळता आला असता. ते झाले नाही. अर्थात व्यवस्थेतल्या या त्रुटींवर बोट ठेवतानाच समाजातल्या गोष्टींचाही विचार करावा लागेल. पूर्वी संस्थाकारण तेजीत असायचे. गणेशोत्सवांच्या नावाने मंडळे कामात असायची. गावात-शहरांत कार्यकर्त्यांची गजबड असे. आज ते बंद झाले आहे. आपापल्या कोशात राहण्याची वृत्ती वाढल्याने सार्वजनिक सहभाग एकुणात कमी झाला आहे. आणखीही एक आयाम आहे. त्यावर चर्चा होणे सर्वाधिक महत्त्वाचे. १९९७ नंतर जन्मलेल्या पिढीला 'जनरेशन झेड' किंवा 'जनरेशन अल्फा' संबोधले जाते. या पिढीला मग ते गरीब असोत किंवा श्रीमंत; देशाच्या इच्छाआकांक्षांशी नाते सांगता येतेय का? झोपाळ्यावाचून झुलण्याच्या या काळात गरीब तरुणांना काळजी आहे ती रोजगाराची अन् श्रीमंत युवकांना ओढ आहे ती परदेशगमनाची. ज्या सरकारी व्यवस्थेबद्दल आशा नाही, जी आपले प्रश्न सोडवू शकत नाही किंवा उडण्याचे पंख देऊ शकत नाही ती असली काय अन् नसली काय, असा विचार जर ही तरुण मंडळी करीत असतील तर तो राजकीय वर्गाने कठोर आत्मपरीक्षण करण्याचा मुद्दा आहे. देशाची प्रगती तिथले तरुण करत असतात. त्यांना लोकशाहीच्या प्रक्रियेत सक्रिय करून घेणे हे कर्त्या पिढीचे कर्तव्य आहे. राजीव गांधी यांनी मतदानाचे वय २१ वर्षांवरुन १८ वर आणले, तेव्हा अपेक्षा हीच होती की, इथला युवक राजकीय प्रक्रियेत सहभागी होईल. वातावरणात चैतन्य आणेल. तो हेतू पूर्ण व्हायचा असेल तर आतातरी व्यापक, बहुस्तरीय उपाययोजना करायला हव्यात.

# ग्रीन जीडीपी - नववसाहतवादाचे साधन?

**'ग्रीन जीडीपी'ची संकल्पना जुनी आहे. एकविसाव्या शतकामध्ये ती प्रकर्षाने पुढे आली. याचे कारण अमेरिका आणि अन्य पाश्चिमात्य प्रगत देशांचा 'ग्रीन जीडीपी'विषयी आग्रह आहे.**



निसर्ग ओरबाडून प्रगती साधायची, त्यानंतर त्याविषयी कळवळा दाखवायचा. पण त्याच्या संवर्धनासाठी आवश्यक तंत्रज्ञान महागडे करून विकसनशील देशांच्या विकासात अडथळे आणणे, हा पाश्चिमात्य देशांचा नववसाहतवादच म्हटला पाहिजे.

मायक्रोसॉफ्टचे सर्वेसर्वा बिल गेट्स यांची अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जी चर्चा झाली त्यामध्ये त्यांनी एक प्रश्न आवर्जून विचारला, तो म्हणजे 'ग्रीन जीडीपी'बाबत भारताचे काय धोरण आहे? सध्या भारताने 'ग्रीन जीडीपी' मोजावा, अशी मागणी पश्चिमी जगाकडून होत आहे. बिल गेट्स यांच्या प्रश्नाला उत्तर देताना पंतप्रधान मोदींनी सांगितले की, तत्त्वतः हे प्रत्येक देशाने केले पाहिजे. आम्ही याबाबत दोन पद्धतीने काम करत आहोत.

एक म्हणजे पर्यावरणस्नेही किंवा पर्यावरणाची किमान हानी होईल, अशा तंत्रज्ञानाचा शोध आणि विकास व्हावा यासाठी एक लाख कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. देशभरातील विद्यार्थ्यांना त्यासाठी प्रवृत्त करत आहोत. कोणत्याही प्रकारचा आर्थिक विकास हा पर्यावरणपूरक व्हावा, ही भूमिका आहे.

'ग्रीन जीडीपी'ची संकल्पना जुनी आहे. एकविसाव्या शतकामध्ये ती प्रकर्षाने पुढे आली. याचे कारण अमेरिका आणि अन्य पाश्चिमात्य प्रगत देशांचा 'ग्रीन जीडीपी'विषयी आग्रह आहे. विशेष म्हणजे ऐतिहासिक काळापासून या देशांनी पर्यावरणाची अपरिमित हानी करून, आपापल्या देशांचा आर्थिक विकास घडवला, साधनसंपत्ती निर्माण केली. त्यामुळे हे देश 'हिस्टॉरीकल पोल्युटर्स' म्हणजेच इतिहासकाळापासून प्रदूषण करणारे देश आहेत.

आज त्यांचा आर्थिक विकास कुंठितावस्थेत आहे. दुसरीकडे आशिया खंडातील भारत, चीनसारखे विकसनशील देश वेगाने विकास करत आहेत. साधनसंपत्तीची निर्मिती करत आहेत, निर्यातवाढीसाठी प्रयत्न रत आहेत. आपल्या देशाला ''एक्स्पोर्ट डेस्टिनेशन'' बनवण्यासाठी, जागतिक पुरवठा साखळीचा भाग बनवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. यासाठी 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' यांसारखे प्रकल्प भारत राबवत आहे.

भारताचा विचार करता, येणाऱ्या २५ वर्षांसाठीचा दीर्घकालीन कृतीआराखडा बनवला आहे. त्यानुसार भारत विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे वाटचाल करणार आहे. याच काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा आकार सध्याच्या २.७५ ट्रिलीयन डॉलरवरून पाच ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे.

जगातील प्रमुख मॅन्युफॅचरिंग हब बनून निर्यातवाढीसाठी भारत प्रयत्नरत आहे. चीनने खूप आधीच हनुमान उडी घेतलेली आहे. आता भारत आत्मविश्वासाने आणि गतिमानतेने मार्गक्रमण करत आहे. अशा वेळी हे पश्चिमी देश भारताला 'ग्रीन जीडीपी'चा आग्रह धरत आहेत.

ही संकल्पना वसुंधरेच्या रक्षणासाठी विकसित केलेली असली तरी सद्यस्थितीत तिसऱ्या जगातील विकसनशील देशांचा आर्थिक विकास रोखण्यासाठीचे साधन म्हणूनही त्याचा वापर केला जातो आहे. 'जीडीपी' म्हणजे ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्शन अर्थात सकल राष्ट्रीय उत्पादन. देशातील वस्तू आणि सेवांचे एकूण उत्पादन. भारतात आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून म्हणजेच एक एप्रिलपासून दर तीन महिन्यांनी 'जीडीपी'ची गणना होते.

पुढील पाच वर्षांमध्ये पाच ट्रिलीयन डॉलरचे उद्दिष्ट गाठायचे असेल तर ८ ते ९ टक्के विकासदर ठेवावा लागेल. २००८ ते २०१८ या काळात भारताने तो ठेवलाही होता. परंतु २०२०मधील कोरोना महासाथीमुळे तो घसरला. तरीही सद्यस्थितीत भारत जगातील सर्वाधिक आर्थिक विकास दर असणारा देश असून, तो ६ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. येणाऱ्या काळात त्यामध्ये दोन ते तीन टक्क्यांची वाढ गरजेची आहे. ते करताना पर्यावरणाचे रक्षणही आवश्यक आहे.

जगामध्ये कोणतेही उत्पादन हे पर्यावरणाच्या हानीशिवाय होऊ शकत नाही. शेतीत वापरल्या जाणाऱ्या रासायनिक खतांमुळे आणि किटकनाशकांमुळे माती, पाण्याचे प्रदूषण होते. वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वायू आणि ध्वनीप्रदूषण होते. या पर्यावरणाच्या हानीची किंमत वजा करून येणारी रक्कम म्हणजे 'ग्रीन जीडीपी'. थोडक्यात, 'जीडीपी'मधून पर्यावरणाची हानी वजा केल्यानंतर येणारा आकडा म्हणजे 'ग्रीन जीडीपी'.

त्यामुळे पर्यावरणाची कमीत कमी हानी करून आर्थिक विकासाला प्राधान्य हे यामागचे सूत्र आहे.अर्थात, पर्यावरणाची हानी मोजायची कशी, हा कळीचा मुद्दा आहे. कोणताही देश स्वतःहून पर्यावरणाची हानी किती झाली हे सांगणार नाही. असे असूनही पश्चिमी देश सातत्याने 'ग्रीन जीडीपी' जाहीर करण्याची मागणी करत आहेत.

२००६ मध्ये चीनने 'ग्रीन जीडीपी' किती आहे याची गणना केली आणि त्याची आकडेवारीही घोषित केली. त्यानंतर आजतागायत चीनने चुकूनही 'ग्रीन जीडीपी' जाहीर केलेला नाही. कारण पर्यावरणाच्या हानीची आकडेवारी जाहीर केल्यास त्या देशावर निर्बंध टाकले जाणार हे अटळ असते. आज जागतिक व्यापाराच्या विविध करारांमध्ये उत्पादनांच्या निर्मितीमध्ये पर्यावरणाची हानी होते की नाही, हा मुद्दा उपस्थित होतो.

भारताने आजपर्यंत कधीही 'ग्रीन जीडीपी' मोजलेला नाही. २०१३मध्ये भारताने यासाठी आयोगाची स्थापना केली. पार्थ गुप्ता त्याचे अध्यक्ष होते. या आयोगाने २०१४-१५मध्ये 'ग्रीन अकौंट फ्रेमवर्क' नावाचा अहवाल सादर केला. त्यापलीकडे भारताने 'ग्रीन जीडीपी' गणनेसाठी काहीही केलेले नाही. याचे कारण 'ग्रीन जीडीपी'च्या माध्यमातून भारताच्या आर्थिक विकासात अडथळा आणण्याचा प्रयत्न पश्चिमी देश करत आहेत.

आजवर पर्यावरणाचे शोषण करून आर्थिक विकास साधल्यानंतर त्यांना निसर्गसंवर्धनाविषयी आलेली जाग हे त्यांचेच एक प्रकारचे षडयंत्र आहे. मानवाधिकारांच्या प्रश्नाबाबत पश्चिमी देशांचा हा दुटप्पीपणा अनेकदा दिसलेला आहे. इतर देशांच्या कारभारात हस्तक्षेपाच्या संधींचा शोध घेणारे हे देश आहेत. हे करताना हे देश आपल्या देशात काय चालले आहे, आपला इतिहास काय, याविषयी कधीच आत्मचिंतन करत नाहीत.


पर्यावरणाची हानी कमी करून विकास दर वाढवायचा असेल तर त्यासाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान कमालीचे महागडे आहे. अशा तंत्रज्ञानावर पश्चिमी देशांची पकड आणि मक्तेदारी आहे. त्यांनी हे तंत्रज्ञान गरीब विकसनशील देशांना देण्याची गरज आहे. पण त्यासाठी ते तयार नसतात. जरी तयारी दर्शवली तरी त्यासाठी प्रचंड किंमत आकारतात, जी विकसनशील देशांना परवडत नसते. थोडक्यात दोन्ही बाजूंनी आडमुठी भूमिका घेत विकसनशील देशांवर दबाव टाकत राहणे ही पश्चिमी देशांची भूमिका दिसते.

भारताने आता कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन शुन्यावर आणावे, यासाठी पश्चिमी देशांकडून सातत्याने दबाव आहे. भारताने या दिशेने प्रयत्न चालवले आहेत. तथापि, उत्पादन क्षेत्राचा विकास करताना पर्यावरणाची हानी अटळ आहे. अशा स्थितीत पर्यावरणाशी सुसंगत विकास कसा साधता येईल, हे भारतापुढचे आव्हान असेल. पर्यावरण रक्षणासाठी 'ग्रीन जीडीपी'चा आग्रह धरणे चुकीचे नाही. पण त्याचा वापर वसाहतवादी मानसिकतेतून होतो आहे.

काही मूठभर देशांचा विकास व्हावा आणि अन्य देशांनी त्यांच्यावर विसंबून परावलंबी राहावे, ही यामागची भूमिका आहे. याला 'डिपेन्डन्सी थिअरी' म्हणतात. गरीब आणि विकसनशील देशांनी श्रीमंत देशांवर अवलंबून राहावे, यासाठीचे हे प्रयत्न आहेत. विकसनशील देशांच्या आर्थिक विकासाला खोडा घालण्याचे साधन म्हणून 'ग्रीन जीडीपी'चा वापर केला जात आहे.

भारताने नववसाहतवादाच्या या दबावाला अजिबात बळी पडता कामा नये. भारताने आर्थिक विकासासाठी ठेवलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रीत करून मार्गक्रमण करावे. कारण विकसित देश बनल्यानंतर भारताची 'बार्गेनिंग पॉवर' वाढणार आहे आणि या देशांची तोंडे आपोआप बंद होणार आहेत.

# तरुणावर 'लव्ह जिहाद'चा आरोप करुन मारहाण
## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नेमकं चाललंय काय?



**पुणे** : पुण्यात ₹लव्ह जिहाद₹ चा आरोप करून तरुणाला मारहाण करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अन्य धमार्तील तरुणीशी ( केलेली मैत्री त्याने तोडावी म्हणून तरुणाला मारहाण करण्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात हा प्रकार घडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस नेते जितेंद्र आव्हाड यांनी काल याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणातील संबंधित तरुण आणि त्याची मैत्रीण विद्यापीठातील उपहारगृहातून निघाले होते. त्या वेळी दुचाकीवरून आलेल्या टोळक्याने विद्याथ्यार्ला अडवले. विद्यार्थी आणि त्याच्या मैत्रिणीकडे त्यांनी आधारकार्ड मागितले. दोघांच्या धर्मांबाबत त्यांनी विचारणा केली. त्यानंतर तू लव्ह जिहाद करतोस का?, असा तरुणावर आरोप करून, कार्यकर्त्यांनी तरुणीला बाजूला नेले. त्यानंतर कार्यकर्त्यांनी तरुणाला बेदम मारहाण केली. या प्रकाराची चौकशी करून कारवाई करण्यात येणार असल्याचं स्पष्टीकरण विद्यापीठाकडून देण्यात आलं आहे.

तरुण विद्यापीठातील कौशल्य विकास केंद्राचा विद्यार्थी आहे. तरुण आणि त्याची मैत्रीण विद्यापीठातील उपहारगृहातून निघाले. त्यानंतर काही जण टू व्हिलरवरुन आले आणि दोघांना अडवलं आणि आम्ही हिंदु संघटनेचे कार्यकर्ते असल्याचं त्यांनी सांगितलं. या नंतर तरुणाला मारहाण केली आणि तरुणीला बाजूला घेऊन तिला लव्ह जिहाद संदर्भात माहिती दिली. तरुणाच्या पालकांना फोन करुन मुलाला घेऊन जा नाहीतर... अशी धमकी दिली. या प्रकरणी आता पुढील चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणी तरुणाने वसतीगृह प्रमुखाकडे तक्रार केली. त्यात कार्यकर्त्यांनी धमकी दिल्याचं नमूद केलं आहे. ह्यमला धमकावून वसतिगृहावर नेले. कपडे भरून निघून जा. परत येथे दिसता कामा नयेह्ल, अशी धमकी दिल्याचं तरुणाने तक्रारीत नमूद केलं आहे.

**विद्यापीठाकडून चौकशी केली जाणार**

विद्यापीठाकडे या प्रकरणाची तक्रार गेली आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. चौकशी झाल्यानंतर योग्य कारवाई करण्यात येणार असल्याचं विद्यापीठाकडून सांगण्यात आलं आहे.

# अंधेरीकर बेहाल

**मुंबई** :
मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातील अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघ कॉस्मोपोलिटीन म्हणून ओळखला जातो. असे असले तरी वाढते प्रदूषण, दररोजची वाहतूक कोंडी यामुळे अंधेरीकरांचा जीव गुदमरला आहे. या भागात पायाभूत समस्या कायम असून त्याचा मोठा परिणाम यावेळेच्या लोकसभा निवडणुकीवर जाणवणार असल्याचा अंदाज राजकीय वतुर्ळातून व्यक्त करण्यात येत आहे. अंधेरी एमआयडीसी, रेल्वे स्थानक परिसर तसेच पश्चिम द्रुतगती महामार्ग येथे कायम वाहतूक कोंडी असते. येथे वाहनांच्या रांगातून वाट काढताना प्रवाशांच्या नाकी नऊ येतात. गोखले पुलाचे काम रखडल्याने मतदारांमध्ये नाराजी आहे. तसेच अंधेरी सबवे येथून गर्दीच्या वेळेस वाहन चालवणे म्हणजे तारेवरची कसरत आहे.

# 3 arrested for kidnapping youth at Borivali



- Kasturba Marg police have arrested three men who are allegedly part of a cyber fraud gang
- Allegations suggest that the kidnappers are members of a cybercrime gang
- Accounts are then exploited to deposit fraudulently obtained funds through cybercrimes

**Mumbai**

The Kasturba Marg police have arrested three men who are allegedly part of a cyber fraud gang for kidnapping a youth. Allegations suggest that the kidnappers are members of a cybercrime gang who lure individuals to open bank accounts. These accounts are then exploited to deposit or transfer fraudulently obtained funds through cybercrimes.

According to police sources, the suspects allegedly abducted a 23-year-old youth in a car from Borivali on Friday night. As the car proceeded towards Dahisar, the victim's cry for help drew the attention of traffic police at the check naka. The traffic cops intercepted the vehicle around 10 pm. On seeing the police approach the vehicle, one of the suspects alighted from the car and fled. The youth identified as Sonu Singh told police that he had been kidnapped. The traffic police detained all individuals involved and took them to Kashimira police station. After listening to Singh's account, the police handed over the suspects and the victim to the Kasturba Marg police station.

The Kasturba Marg police have filed the case under various sections of IPC and arrested the three men — Tushar Chakorkar, Pawan Kir, and Dilkhush Teli, while the police are on the lookout for the accused identified as Saurabh who fled the police. Singh runs a placement agency from Goregaon. According to his statement, in February, two individuals, Tushar and Saurabh, approached him through Just Dial, claiming to be in the trading business and seeking people for marketing and share trading. They expressed their lack of proper residential address and requested Singh to arrange and open current bank accounts for them under the name of his company. Initially hesitant, Singh relented when they offered him money and he opened two current bank accounts using his documents and company name.

However, when the accused demanded all documents, including ATM cards and passbooks, Singh became suspicious and refused to comply. Subsequently, the accused kidnapped Singh's friend, Mittu Dass, 26, from Andheri and took him to Pune, torturing him to pressure Singh into providing the bank documents. Dass managed to escape and return to Mumbai last week. Meanwhile, the accused lured Singh into a meeting near the Sanjay Gandhi National Park under the pretext of offering another job opportunity. Singh was forcibly kidnapped and they attempted to take him to Pune, said a police officer.

Dass, speaking to mid-day, described how the suspects kidnapped him and took him to a hotel in Pune, where they assaulted him in an attempt to pressure Singh. Dass managed to escape when his kidnappers had fallen asleep. "We are investigating the matter seriously, exploring every possible angle to determine whether these accused are indeed members of a cyber crime gang. They are currently in police remand," said a police officer from Katurba Marg police station.

No of suspects named in FIR : 4

# No way Virat Kohli going to be left out of T20 World Cup squad; Rishabh Pant leading selection race in IPL 2024: Report

**Mumbai**

Virat Kohli notched up a record eighth century in Royal Challengers Bengaluru's previous outing against 2008 winners Rajasthan Royals at the Indian Premier League. The former RCB skipper has been Bengaluru's lone warrior with the willow in their first five games of the new season. Registering his joint career-best score of 113* against Rajasthan, Kohli has two more centuries than second-placed batters - Chris Gayle and Jos Buttler (6) in the elite list.

Kohli remained unbeaten on 113 off 72 balls to help RCB post 183-3 in 20 overs. In the same encounter, 2022 Orange Cap winner Jos Buttler slammed a 58-ball century to seal RR's six-wicket win in 19.1 overs. Kohli completed his century in 67 balls, which is the joint-slowest ton in the history of IPL. Manish Pandey scored a century in 67 balls to notch up the slowest ton against Deccan Chargers back in the IPL 2009.

Kohli's strike rate has come under the scanner of his critics in the T20 World Cup year. However, there is no denying that the former India skipper is taking risks and playing aggressive cricket in the world's richest T20 tournament - the IPL. Even legendary West




Indies cricketer Brian Lara cleared Kohli's candidature and kept him in his list of the top 3 batters for the T20 World Cup.

No way Virat Kohli going to be left out

According to a report filed by Cricbuzz, Kohli is expected to retain his place in the Indian T20 squad for the ICC event later this year. Even though Kohli's strike rate was questioned in the IPL 2024, the report suggested that there was no way Kohli would be left out of the World Cup squad. In the first five IPL games, Kohli batted at a strike rate of 146.29 as an RCB opener. The 35-year-old is the leading run-getter at the IPL 2024.

Rishabh Pant leading selection race for T20 World Cup

With Rohit Sharma and Yashasvi Jaiswal as openers, it will be interesting to see how selectors add Shubman Gill to the batting lineup if Kohli seals his No.3 position in the World Cup squad. The report mentioned that Delhi Capitals skipper Rishabh Pant is also leading the selection race for the vacant wicketkeeper position at the T20 World Cup. Pant has an edge over wicketkeeper-batters Sanju Samson, Ishan Kishan, Jitesh Sharma and KL Rahul in the IPL 2024.

When will India announce T20 World Cup squad?

In his comeback season at the IPL 2024, Pant has smashed 153 runs in five games for the Delhi Capitals. Pant has registered scores of 18, 28, 51, 55 and 1 for the Delhi Capitals. "Let a few more matches go. He is doing very well, as you all must have seen, keeping batting. So he's held up well and his form has been fantastic, especially the way he has batted in the last two games. So let another week go and I'll be able to answer that question, provided the selectors want to pick him. So that's most important. Yeah, yeah, he's fully fit," former Board of Control for Cricket in India (BCCI) president Ganguly had said. Ajit Agarkar-led BCCI selection committee is tipped to pick India's squad for the T20 World Cup in the first week of May.

# अहमदाबाद मार्गावरील जीर्ण पुलाने दिला धोक्याचा इशारा

## ■ धानीवरी येथील पुलाच्या नूतनीकरणाची गरज ■ प्रशासनाकडून मात्र तात्पुरत्या उपाययोजना

■ **डहाणू** : मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मुंबई वाहिनीवरील धानीवरी येथील सुसरी नदीवर असलेला पूल जीर्ण झाला आहे. पुलावर मध्यंतरी भगदाड पडले होते. पूल आधीच जीर्ण झाला असून, त्यात पुलावर खड्डा पडल्याने येथे पुलाच्या नूतनीकरणाची गरज व्यक्त करण्यात आली होती. मात्र तत्कालीन महामार्ग प्रशासनाकडून तात्पुरती उपाययोजना करण्यात आल्या होत्या.



सध्या महामार्गावर कॉंक्रीटीकरण करण्याचे काम सुरू असून, पुलाची दुरुस्ती न करता यावरून कॉंक्रीटीकरण केल्यास भविष्यात पुलाला धोका निर्माण होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे. मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर मागील पावसाळ्यात चिंचपाडा येथील पूल जीर्ण झाल्यामुळे पुलाचा स्लॅब कोसळल्याची घटना समोर आली. नंतर पुलावरील वाहतूक थांबवण्यात येऊन पुलाची दुरुस्ती करण्यात आली. सध्या मनोर-वाडा रस्त्यावर टेन जवळील पूल जीर्ण आणि धोकादायक झाल्याने येथून अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्यात आली आहे. अशीच परिस्थिती काहीशी परिस्थिती राष्ट्रीय महामार्गावरील धानिवरी येथील पुलाची आहे. याची वेळीच दखल न घेतल्यास भविष्यात मोठा धोका निर्माण होणार आहे. सुसरी नदीवर पूल एकेरी महामार्ग असल्यापासून अस्तित्वात आहे. महामार्गावरून रोजच्या वाहतुकीत मोठा बदल झाला आहे. सध्या मोठ्या प्रमाणात वाहने पुलावरून ये-जा करतात. दरवर्षी पावसाळ्यात पुलावर खड्डे पडून अडचण निर्माण होते. मध्यंतरी पावसाळ्यात पुलावर पूल जोडण्यासाठी असलेल्या सांध्याजवळ (एक्सपेंशन जॉइंटजवळ) मोठा खड्डा पडला होता. पूल जीर्ण झाला असून, यावरील खड्ड्यांमुळे भविष्यात निर्माण होणारा धोका पाहता पुलाच्या पुनर्बांधणीची गरज व्यक्त करण्यात आली होती. तत्कालीन ठेकेदार कंपनीकडून याठिकाणी वेळोवेळी तात्पुरत्या उपाययोजना करून वेळ मारून नेण्यात आली. मात्र सद्यस्थितीत पुलावरील खड्डा दिसून येत नसला तरी पूल वाहतुकीच्या दृष्टीने धोकादायक आहे.

“ गेल्या चार ते पाच वर्षांपासून पुलावर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात खड्डे पडत आहेत. पुलावर एका ठिकाणी भगदाड पडले असून आम्ही वेळोवेळी संबंधित प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली आहे. मात्र संबंधित प्रशासनाकडून वेळोवेळी याठिकाणी तकलादू तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सध्या सुरू असलेल्या कॉंक्रीटीकरण कामात या पुलाची दुरुस्ती रखडण्याची भीती आहे. त्यामुळे भविष्यात निर्माण होणारा धोका लक्षात घेता कॉंक्रीटीकरण करण्यापूर्वी पुलाची दुरुस्ती करण्याची गरज अधोरेखित होत आहे. – **हरबंस सिंह नन्नाडे**, महामार्ग अभ्यासक

“ धानिवरी येथील सुसरी नदी पुलावरील खड्ड्यांबाबत आम्हाला कल्पना नव्हती. प्रसारमाध्यम प्रतिनिधींकडून आम्हाला माहिती मिळाली असून, लवकरच याठिकाणी चौकशी केली जाईल. पूल धोकादायक असल्याचे आढळल्यास येथे आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात येतील. – **सुहास चिटणीस**, प्रकल्प व्यवस्थापक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

■ **खरेदीसाठी नागरिकांची गर्दी**
सोन्याच्या किमतीमध्ये वाढ झाली असतानाही सोने खरेदीसाठी सराफांच्या दुकानात सोने खरेदीसाठी नागरिकांची गर्दी झाली होती. तर, दुचाकी आणि कार खरेदीसाठीही वाहन विक्री दुकानात ग्राहकांचा उत्साह दिसून आला.

■ **स्वागत यात्रेवर पुष्पवृष्टी**
नौपाडा येथे स्वागत यात्रेवर पुष्पवृष्टी करण्यासाठी मंच उभारण्यात आले होते. अवघ्या काही फुटांवर हे विविध मंच होते. यात्रेत सहभागी होणाऱ्यांवर त्यांच्याकडून पुष्पवृष्टी केली जात होती.

■ **नागरिकांच्या संख्येत घट**
ठाण्यात दरवर्षी मोठ्याप्रमाणात नागरिक यात्रेत सहभागी होत असतात. परंतु यावर्षी नागरिकांच्या संख्येत काहीशी घट झाल्याचे दिसून आल्याचे चित्र होते.

## गुढीपाडव्याचा उत्साह शिगेला



■ **ठाणे** : ठाणे शहरात गुढीपाडवा निमित्ताने नववर्ष स्वागत यात्रा निघाली. ठाण्यात श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास मंदिर संस्थेच्या वतीने नववर्ष स्वागत यात्रा ढोल- ताशांचा गजरात निघाली. आकर्षक चित्ररथ, पारंपरिक नृत्य, सामाजिक संदेश देणारे चित्ररथ या यात्रांमध्ये पाहायला मिळाले. मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता, अभिनेत्री उपस्थित होते. पारंपारिक वेशभूषेमध्ये महिला, तरुण-तरुणी एकत्र जमून यात्रेची क्षणचित्रे, छबी मोबाईलमध्ये टिपत होते. वाहन विक्री दुकाने, सराफाच्या दुकानांमध्येही गर्दी पाहायला मिळाली. ठाण्यात श्री कौपिनेश्वर सांस्कृतिक न्यास मंदिर संस्थेतर्फे स्वागत यात्रेची मोठ्या उत्साहात तयारी करण्यात आली होती. सकाळी ७ वाजता यात्रेची कौपिनेश्वर मंदिरातून सुरूवात झाली. स्वागत यात्रेचे अध्यक्ष म्हणून जेनरिक फार्मा व्यवसायचे अर्जुन देशपांडे यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यात्रेच्या सुरुवातीपासून सहभागी झाले होते. सुमारे ५० चित्ररथांनी सहभाग नोंदविला होता. यंदाच्या यात्रेत ठाणे महापालिकेच्या वतीने विविध रथ सहभागी झाले होते. 'घनकचरा व्यवस्थापन', 'पाणी पुरवठा विभाग' 'प्रदूषण नियंत्रण कक्ष', शिक्षण, प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन, स्मार्ट सिटी विभागाचे रथ सहभागी झाले होते. ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागाकडून शैक्षणिक गुढीया संकल्पनेवर आधारित रथ साकारण्यात आला होता. यामध्ये काही विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षणाविषयी जनजागृती करत होते. पाणीपुरवठा विभागाच्या रथामार्फत पाणी वाचवा, पाणी जपून वापरा असे विविध संदेश दिले जात होते. तर शहरातील इतर सामाजिक संस्थांकडून विविध संदेश देणारे चित्र रथ साकारण्यात आले होते. यंदा प्रबोधन करणारे सायकलस्वार, मल्लखांब आणि जिम्नॅस्टिक प्रात्यक्षिके, महिला दुचाकी रॅलीचा समावेश होता. यात्रेच्या मार्गावर रस्त्यांच्या दुतर्फा तसेच चौकाचौकांत मध्यभागी संस्कार भारती संस्थेतर्फे रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. या रांगोळ्यांनी यात्रेची शोभा अधिक वाढवली होती.

## खारघरमध्ये पालिकेकडून रस्त्याचे डांबरीकरण

■ **खारघर** : पनवेल महापालिकेकडून खारघरमधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. तळोजाकडून पेठपाडा गावाकडे जाणाऱ्या आणि सेंट्रल पार्क रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहे. खारघर जलवायूकडून ओवेगावाकडे जाणाऱ्या आणि गुरुद्वाराकडून रांजणपाडाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहनांसह नागरिकांची वर्दळ असते. दरम्यान, सर्कलच्या चोहोबाजूंनी रस्ते खड्डेमय झाले होते. तर जलवायूकडून ओवे गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली होती. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात होती. त्यामुळे पनवेल महापालिकेकडून रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत आहेत.

## कल्याणमध्ये थुंकण्यावरून मारहाण; चार युवकांना अटक

**कल्याण** : आग्रा-मुंबई लष्कर एक्स्प्रेसमध्ये प्रवासादरम्यान थुंकण्यास विरोध केल्याने दोन प्रवाशांना तरुणांच्या टोळीने बेदम मारहाण केल्याची घटना मनमाड-नाशिक रोड रेल्वे स्थानकादरम्यान घटना घडली. मारहाण करणाऱ्या युवकांना कल्याण रेल्वे स्थानकात रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेतले. याप्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपींना मनमाड रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

रविवारी दुपारी प्रशांत सिंग आणि जगविर उर्फ गणेश सिंग हे दोघे आग्रा-मुंबई लष्कर एक्स्प्रेसमधून मुंबईच्या दिशेने प्रवास करत होते. मनमाड आणि नाशिक रोड रेल्वे स्थानकादरम्यान



काही तरुण एक्स्प्रेसमध्ये थुंकत होते. प्रशांत आणि गणेशने या तरुणांना येथे थुंकू नका, असे सांगत थुंकण्यास विरोध केला. त्यामुळे संतापलेल्या तरुणांनी प्रशांत आणि जगवीर यांच्याशी वाद घालत दोघांना बेदम मारहाण केली. याच डब्यात प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी मध्यस्थी करत हे भांडण सोडवले. तसेच याबाबत रेल्वे पोलिसांना माहिती दिली.

या घटनेची माहिती मिळताच कल्याण रेल्वे पोलिसांनी लष्कर एक्स्प्रेस कल्याण रेल्वे स्थानकात येताच मारहाण करणाऱ्या चार तरुणांसह दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. प्रमोद माळी, अजय पवार, गणेश कापसे, अजय कापसे अशी अटक केलेल्या तरुणांची नावे आहेत.

मनमाड आणि नाशिक रोड रेल्वे स्थानकादरम्यान ही घटना घडल्याने कल्याण रेल्वे पोलिसांनी मनमाड रेल्वे पोलीस ठाण्यात हा गुन्हा वर्ग करत चारही आरोपींना मनमाड रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

## शेतकऱ्याच्या झोपडीला आग

■ **डहाणू** : तालुक्यातील तवा ग्रामपंचायत तर अंतर्गत येणाऱ्या धामटणे कासटपाडा येथील लडका बुध्या कासट यांच्या शेतावरील झोपडीला सोमवारी दुपारी २ च्या सुमारास आग लागली. यात झोपडी जळून खाक झाली. लडका बुध्या कासट हा शेतकरीकुटुंबासह शेतावर भाजीपाला लागवड करतो. शेतावर त्यांनी कायमस्वरूपी राहण्यासाठी झोपडी बनवली होती. यात भात, तांदूळ, संसारोपयोगी भांडी, शालेय विद्यार्थ्यांची बँक पासबुक व इतर कागदपत्रे, कपडे, चादरी होत्या. तसेच भाजीपाला विक्रीमधून आलेले ५ हजार पाकिटात ठेवले होते. हे सर्व जळून खाक झाले आहे. शेतकरी दुपारी शेतीचे काम करत असताना दुपारी सर्वजण बाहेर होते. त्यावेळी अचानक झोपडीच्या वरच्या बाजूने आगीचे डोंब निघाल्याने आग लागल्याचे समजले. ऊन व वारा असल्याने आगीने रौद्र रूप धारण करत पूर्ण झोपडी जळून खाक झाली.

## ट्रकची १० हून अधिक वाहनांना धडक

### रुग्णवाहिकेचा चेंदामेंदा, अनेकांना गंभीर दुखापत



■**नागपूर, प्रतिनिधी,**
रविवारी रात्रीच्या सुमारास नागपुरात घडलेल्या एका भीषण अपघातानं तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं. नागपुरातील मानकापूर कल्पना टॉकीज चौकात एका बेदरकार ट्रकनं दहा पेक्षा जास्त गाड्यांना धडक दिली. प्राथमिक माहितीनुसार या भीषण अपघातात १२ पेक्षा जास्त जण जखमी झाले असून त्यांच्यावर तातडीनं नजीकच्या विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरु करण्यात आले. दरम्यान ट्रकनं धडक दिलेल्या वाहनांमध्ये एका रुग्णवाहिकेचाही समावेश असून, त्या रुग्णवाहिकेचा या अपघातात चेंदामेंदा झाल्याचं पाहायला मिळालं. एमएच ३४ एबी ७८८१ क्रमांकाच्या ट्रकचालकाचं मानकापूर उड्डाणपुलावरून उतरताना ट्रक वर असणारं नियंत्रण सुटलं आणि समोर सिग्नलवर थांबलेल्या वाहनांना हा ट्रक जाऊन धडकला. ही धडक इतकी भीषण होती की, काही कार फरफटत पुढे गेल्या... तर काही कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. अपघाताची बाब लक्षात येताच इथं मोठ्या संख्येने नागरिकांची आणि बघ्यांचीही गर्दी गोळा झाली. अपघातानंतर काही काळासाठी कोराडी मार्गावरील वाहतुकही पूर्णपणे विस्कळीत झाली होती. ज्यानंतर वाहतूक विभागाकडून तातडीनं वाहतूक कोंडी मोकळी करण्यासाठीही पावलं उचलण्यात आली.

## सात लाखांची लाच मागितल्या प्रकरणी तलाठ्याला अटक

■ **मुंब्रा** : मुंब्रा येथील तलाठी धोंडिबा गोपीनाथ खानसोले याला इमारत बांधकाम व्यावसायिकाकडून सात लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे.तलाठी खनसोले हे मुंब्रा तलाठी कार्यालयात कार्यरत होते. तलाठयाने बांधकाम व्यावसायिकाकडे सात लाख रुपयांची लाच मागितली व लाचेची रक्कम न दिल्यास खोटया प्रकरणात अडकवण्याची धमकी दिली होती.ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याबाबत व्यावसायिकाने तक्रार केली.रेतीबंदर येथील एका येथे हॉटेलमध्ये व्यापारी व तलाठयामध्ये लाचेच्या रकमेबाबत बैठक झाली.७ लाख रुपयांच्या लाचेऐवजी ३ लाख रुपये घेण्याचे ठरवण्यात आले.यावेळी लाचलुचपत विभागाचे कर्मचारीही साध्या वेशात उपस्थित होते. त्यांनी खानसोले याला लाचखोरीच्या आरोपाखाली अटक केली. खनसोले यांच्याविरुद्ध कळवा पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.

## टँकरची दुचाकीला धडक एकाचा मृत्यू

■ **ठाणे** : ठाण्याच्या घोडबंदर रोडवरील उन्नती ग्रीन सर्कल येथे पाण्याच्या टँकरने दुचाकीला दिलेल्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला. तर दोन जण जखमी झाले.ही घटना रविवारी रात्री घडली.ठाण्याच्या घोडबंदर रोडवरील कासारवडवली येथील उन्नती ग्रीन सर्कल येथे हा अपघात झाला. कासारवडवली येथे राहणारे जगन्नाथ परब आपली दोन मुळे अर्णब परब(१३) व स्वयंम परब(०२) यांना दुचाकीवरून घेऊन जात असतानाच, एका पाण्याच्या टँकरने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. त्या धडकेमुळे मागे बसलेले अर्णब आणि स्वयंम हे दूर फेकले गेले. तर दुचाकी चालविणारे जगन्नाथ परब टँकरच्या टायरखाली सापडले. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर अर्णब आणि स्वयंम याच्या डोक्याला इजा झाली असून त्यांना रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. टँकरचालक राजकुमार पवार असल्याची माहिती कासारवडवली पोलिसांना मिळाली असून पोलिस कारवाई सुरु आहे.

## सोन्याच्या दुकानात चोरी करणाऱ्या महिलांना अटक

■ **मुंब्रा** : कळवा येथील अर्जुनसिंह राठोड यांच्या राजलक्ष्मी ज्वेलर्स या सोने विक्रीच्या दुकानामध्ये दोन अनोळखी महिलांनी काउंटरवर ठेवलेल्या चांदीच्या पैजणांची चोरी केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून कळवा पोलिसांनी रेखा शिंदे व सुगंधा मकाळे या आरोपी महिलांना अटक केली.

याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी दुकानाचे सीसीटीव्ही फुटेज हस्तगत केले व गोपनीय सुत्रांमार्फत गुन्ह्यातील



आरोपी महिलांना १ तासात ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली. त्यांनी चोरीची कबूली दिली व तांत्रीक पुराव्यात देखील त्यांनी चोरी केल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून चांदीच्या पैजनाचा जोड जप्त करण्यात आला.अटक आरोपींविरोधात नालासोपारा येथील निळेगाव येथील ज्वेलर्सच्या दुकानातून ११० ग्रॅम वजनाचे ५ लाख ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीचा नालासोपारा येथे गुन्हा दाखल आहे.

याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक सागर सांगवे अधिक तपास करत आहेत. तपास पथकात पोलिस उपनिरीक्षक सागर सांगवे, शहाजी एडके, रमेश पाटील, श्रीमंत राठोड, दादासाहेब दोरकर, राहुल पवार, अमोल ढावरे, प्रशांत लवटे यांचा समावेश होता.

## नवी मुंबईत आढळल्या पाणपक्ष्यांच्या ४७ प्रजाती

■ **तुर्भे**: राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाच्या निर्देशानुसार नवी मुंबईतील पाणथळ क्षेत्रात येणाऱ्या स्थलांतरित व स्थानिक पक्ष्यांची गणना सुरू आहे. आशियाई पाणपक्षी गणना २०२३ उपक्रमांतर्गत ही गणना केली जात असून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या गणनेत देशी आणि स्थलांतरित अशा एकूण ४७ पाणपक्ष्यांच्या प्रजाती आढळून आल्या आहेत.यंदा आशियाई पाणपक्षी गणना २०२३ उपक्रमांतर्गत खाडीकिनाऱ्यावरील पक्ष्यांची गणना करण्यात येणार असून त्याची नोंद ठेवली जाणार आहे.

# शहापुरात १४८ गावपाड्यांना टँकरने पाणीपुरवठा!

## पाडाळे, वेहळोली, खराडे,आदिवली धरणांतून अतिरिक्त पाणी सोडण्याचे प्रयत्न

■ **शहापूर**: उन्हाच्या तीव्र झळांनी शहापूर तालुका होरपळून निघाला आहे. वाढत्या तापमानाचा परिणाम येथील पाणीटंचाईवर झाला आहे. पाणीटंचाईच्या संकटाने तालुक्यातील २६ गावे आणि तब्बल १२२ वाड्यावस्त्या तहानेने व्याकुळ झाल्या आहेत. या टंचाईग्रस्त गावांना ३० टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. परंतु टंचाईग्रस्त गावे आणि पाड्यांची दिवसागणिक वाढती संख्या लक्षात घेऊन आणखी ३ टँकर वाढवण्याचा प्रस्ताव ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आला आहे.

पाणीटंचाईच्या संकटकाळातील दुसऱ्या टप्प्यात प्रभावाखाली आलेल्या नांदवळ, गेगांव, शिळ,



शेलवली (खं), कळगांव, ठिले, शेंद्रुण या गावांना अंतर्गत नळपाणी पुरवठा योजना आहेत. परंतु या योजनांचा जलस्त्रोत असलेले नदी आणि ओढे आटले असल्याने या गावांच्या नळपाणी पुरवठा योजना बंद पडल्या आहेत म्हणून आटलेल्या नदी आणि ओढ्यांवरील धरणांतून अतिरिक्त पाणीपुरवठा करण्यासाठी तहसीलदार कोमल ठाकूर यांच्यास्तरावरुन पाटबंधारे खात्याकडे प्रयत्न सुरु आहेत. आदिवली, वेहळोली, खराडे तसेच पाडाळे धरणातून अतिरिक्त पाणी सोडण्यात आल्यास आटलेल्या काळुनदी, कानवेनदी तसेच परिसरातील ओढ्यांना पाणी येऊन टंचाई परिस्थितीचा सामना करणे सोपे होईल,असा कयास असल्याने गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना कळविले आहे.



◆तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांच्या संख्येत वाढ झाल्याने आपटे, मधलीवाडी, खंडवीवाडी, मानेखिंड, आंबेखोर, अस्नोली, दहिवली, मसणेपाडा, कवड्याची वाडी, मुसईवाडी, निरगुडवाडी, विहिगांव या गावे आणि पाड्यांचा देखील टंचाईग्रस्त गावांच्या यादीत समावेश झाला आहे. तालुक्यात सध्या ३० टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे. त्यात ३ टँकर वाढवण्याच्या मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

## भिवंडीत यंत्रमाग कारखान्याला भीषण आग



■ **भिवंडी** : कल्याण रोड जवळील सुभाष नगर येथील मुरलीधर कंपाऊंडमधील यंत्रमाग कारखान्याला अचानक आग लागली.। आगीत कपड्याचे तागे जळून खाक झाल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. सुदैवाने आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. मात्र आगीत कच्च्या कपड्याचे तागे जळून खाक झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण नाक्याजवळील सुभाष नगरच्या मुरलीधर कंपाऊंडमध्ये कच्च्या कपड्यावर काम करणारा यंत्रमाग कारखाना सुरू होता.

मात्र दुपारी तेथे अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले.त्यावेळी कामगारांनी प्रसंगावधान राखत कारखान्यातून पळ काढला. त्यामुळे जीवितहानी टळली आहे. नंतर अग्निशमन दलाला आगीची माहिती देण्यात आली. परंतु वाहतूक कोंडीमुळे अग्निशमन दलाला घटनास्थळी पोहचण्यास उशीर झाला.

## सिगरेट ओढताना व्हिडीओ काढल्याने संतापली तरुणी... मित्राच्या मदतीने केली तरुणाची हत्या



■**नागपूर** : नागपुरात पुन्हा एकदा हत्याचं सत्र सुरु झाल्याचं पाहायला मिळतं आहे. नागपुरात क्षुल्लक कारणावरुन एका तरुणीने मित्रांच्या मदतीने एका तरुणाची हत्या केली आहे. या सगळ्या धक्कादायक प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी याप्रकरणी दोन तरुणींसह तीन आरोपींना अटक केली आहे.नागपुरातील हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत महालक्ष्मी नगर परिसरात ही धक्कादायक घटना घडली. सिगारेट ओढताना व्हिडिओ का घेतला या वादतून तरुणीने पुरुष सहकाऱ्यांना बोलावून एका तरुणाची हत्या केली आहे. ही सर्व घटना सीसीटीव्हीत चित्रित झाली आहे. रणजित राठोड (28 वर्ष) असं मृत तरुणाचे नाव आहे. तर जयश्री पानझरे (30) सविता सायरे (24) आणि आकाश राऊत (26) वर्ष अशी तीन आरोपींची नावे आहेत. मृत रणजितचे कपड्याचे दुकान आहे. दुकानाच्या परिसरातील पान टपरीजवळ उभे राहून सिगारेट ओढणाऱ्या जयश्रीचा रणजितने व्हिडिओ घेतला होता. तसेच तो तिच्याकडे एकटक पाहत असल्याचा आरोपही जयश्रीने केला. यावरून दोघांमध्ये जोरदार वाद झाला. त्यावेळी जयश्री आणि सविताने रणजितला शिवीगाळ केली होती. त्यानंतर जयश्रीने तिच्या आणखी पुरुष मित्रांना फोन करून बोलावलून घेतले. दोघींनी मित्र आकाशच्या मदतीने रणजितवर धारधार शस्त्र आणि दगडांनी हल्ला केला. या हल्ल्या रणजित हा गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र रणजितचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी या प्रकरणी दोन तरुणींसह तीन आरोपींना अटक केली आहे. जयश्रीने आकाश राऊत याला फोन करुन बोलावण्यानंतर तिघांनीही रणजितला जबर मारहाण केली होता. त्यांनी रणजितला खोट्या गुन्ह्यात फसविण्याची धमकी देऊन माफी मागण्यास भाग पाडले. मात्र त्याने माफी मागण्यास नकार दिल्यामुळे जयश्री आणि सविता यांनी रणजितचे हात पकडले आणि आकाशने चाकूने सपासपा वार करून त्याचा खून केला.

## भाजप नेत्याच्या घराचे काम सुरु असताना मोठी दुर्घटना



■**मुंबई** : नाशिकमध्ये एक भयंकर अपघात घडला आहे. नाशिकच्या गंगापूर रोड येथील डिकेनगर सावरकर येथे भिंत कोसळून दोन कामगारांचा मृत्यू झाला आहे.तर दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी गंगापूर पोलिसांकडून अधिक चौकशी करण्यात येत आहे. भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष केदा आहेर यांच्या घराचे काम सुरू असतानाच हा अपघात घडला आहे. सोमवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली आहे. इमारतीच्या पाया भरणीसाठी बांधली जाणारी भिंत कोसळल्याने हा अपघात झाल्यानं परिसरात खळबळ उडालीय. या अपघाताच्या संदर्भात गंगापूर पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आलाय.अपघातात दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या दोघांवर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत.